रायगड, रविवार दि. २६ नोव्हेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

'अंतिम' मानहानी

पान ६ वर

अलिबाग-नागाव रोडटच आमराई प्लॉट विकणे आहे
१५.५ गुंठे, क्लियर टायटल, फ्रेश, हमरस्त्याला लागून सिटी सर्वे, संपूर्ण तार कंपाऊंड, नळ, इलेक्ट्रीसिटी पोल जवळच, Direct Party, एजंट सुद्धा चालेल.
संपर्क - ९७६९१०८१७०

वे|घ|क

महाडमध्ये घरफोडी

महाड : शहरातील चांभारखिंड येथे हायवे प्लाझा इमारतीतील बंद फ्लॅटमधून सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह सहा लाख एकवीस हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. सदरची घटना शुक्रवारी २४ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या दरम्यान घडली. भर दुपारच्या सुमारास ही चोरीची घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याबाबत स्वप्नाली अनंत शिंदे यांनी पोलिसात फिर्याद दिली. त्यानुसार इमारतीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये तीन अज्ञात चोरटे कैद झाले आहेत. त्यांच्याविरोधात महाड शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तीन महिन्यापासून सदर फ्लॅटचे अंतर्गत दुरुस्तीचे काम सुरु असल्याने शिंदे ➤ पान २ वर

दोन वेगवेगळ्या अपघातात सहा जखमी

महाड : मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी टोळ तसेच नडगाव हद्दीत अपघात झाला. दोन्ही अपघातामध्ये सहा प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. अपघाताची नोंद एमआयडीसी पोलिस आणि महाड तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाने मुंबई ते महाड जाणारी इको कार ही शनिवारी सकाळी साडेपाच वाजता महाड तालुक्यातील टोळ गाव हद्दीतील पुलावर आल्यानंतर चालकाचा गाडीवरून ताबा सुटल्याने समोर जाणाऱ्या एका अज्ञात कंटेनरला मागू धडक बसली. या अपघातात चालक सुरज दिलीप जाधव, प्रवासी ➤ पान २ वर

हिंगोली मेळाव्याला वडेट्टीवार जाणार

मुंबई : छगन भुजबळ यांच्यासोबत कोणत्याही मंचावर जाणार नसल्याचं जाहीर करणाऱ्या विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा एकवार आपली भूमिका बदलली आहे. ओबीसींच्या हिताच्या रक्षणासाठी आपण हिंगोली येथे होणाऱ्या ओबीसी मेळाव्याला जाणार आहोत असे त्यांनी शनिवारी जाहीर केले. भुजबळ तसेच इतरांचा अनेकदा फोन आल्याने आणि ओबीसींच्या ऐक्याच्या भावनेला छेद जाऊ नये म्हणून मी मेळाव्याला जात आहे असे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी जालना जिल्ह्यातील अंबड येथे ओबीसींचा सर्वपक्षीय पहिला मेळावा झाला होता. त्यानंतर, ओबीसींच्या आरक्षण लढ्यात दोन समाजामध्ये विष पेरणं चुकीचं आहे. त्यामुळे यापुढे मी भुजबळांच्या मंचावर कुठल्याही कार्यक्रमात जणार नाही, असे ते म्हणाले होते.

जालना दगडफेक प्रकरणी आरोपीला अटक, कोठडी

जरांगेंबाबत भूमिका बदलली ?

। जालना । वृत्तसंस्था ।
अंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांच्या उपोषणादरम्यान झालेल्या दगडफेक प्रकरणी पोलिसांनी ऋषिकेश बेदरे या आरोपीला अटक केली आहे. यांच्याकडून एक गावठी पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुस जप्त करण्यात आलं आहे. अंतरवाली सराटीतील लाठीमार प्रकरणी जालना अधीक्षकांवरची कारवाई बाजूला ठेवून त्यांना पुण्यात नियुक्ती देण्यात आल्याच्या दुसऱ्याच दिवशी दगडफेक प्रकरणातील आरोपीला अटक झाल्याने जरांगेंबाबत राज्य सरकारच्या भूमिकेत बदल झाल्याचे दिसत आहे.

कट रचून पोलिसांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणे व त्यांच्यावर हल्ला करणे आदी प्रकरणी बेदरे याच्याविरुध्द गुन्हा दाखल आहे. त्याचा शोध घेत असताना तो शुक्रवारी इतर दोन साथीदारांसह आढळून आला होता. पोलिसांनी त्यांच्यावर ३०७ कलमातंर्गत गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, त्याला शनिवारी न्यायालयापुढे हजर केले असता दोन डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

जरांगे हे २९ ऑगस्टपासून अन्य दहा जणांसह उपोषणाला बसले होते. त्यांची तब्येत बिघडल्याने त्यांनी इस्पितळात भरती व्हावे असे प्रशासन व पोलिसांचे म्हणणे ➤ पान २ वर

जरांगे संतप्त

दरम्यान, बेदरे याच्या अटकेबाबत जरांगे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. आमच्या कार्यकर्त्यांना विनाकारण अटक करण्यात आली आहे असे त्यांचे म्हणणे असून घटनेनंतर दोन महिन्यांनी आमच्या लोकांना अटक करण्याचा हा कोणता डाव आहे असा सवाल त्यांनी विचारला आहे. अंतरवाली सराटीत आमच्यावर हल्ला झाला होता, आम्ही कट रचलेला नव्हता याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

मूळचा बीड जिल्ह्यातील गेवराई येथील ऋषिकेश बेदरेची वाळू पट्ट्यात दहशत आहे. त्याच्यावर बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात १४ गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. यात दरोडा, मारहाण, बेकायदा शस्त्र बाळगणे, जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, रस्त्यात अडवून लूट करणे, दारू विक्री, जुगार, बदनामी करणे यासह अन्य गुन्हे दाखल आहेत.

नियमानुसार कारवाई

दरम्यान या अटकेबाबत आपल्याला माहिती नाही. मात्र पोलीस नियमानुसार कारवाई करतील अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नोंदवली आहे.

शिंदे गटाचा दुतोंडीपणा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शहापूरमधील जबरदस्तीच्या जमीन मोजणीचा डाव गुरुवारी स्थानिक शेतकऱ्यांनी तर उधळून लावलाच. मात्र यानिमित्ताने शिंदे गटाच्या दुतोंडी राजकारणाचाही पर्दाफाश झाला आहे.

महसुल व एमआयडीसीचे अधिकारी गुरुवारी भरपूर पोलीस फौजफाटा घेऊन शहापूरात आले होते. त्यामुळे या मोजणीला सत्तारुढ शिंदे गटाचे छुपे समर्थन असावे हे स्पष्ट होते. मात्र मोजणीला शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केल्याने शिंदे गटाच्या स्थानिक नेत्यांनी बाजू बदलली. आणि आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत असे भासवण्याचा प्रयत्न करु लागले. मात्र शेतकऱ्यांनी त्यांचा हा कावा ओळखून त्यांना बाजूला सारले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांनी महसुल आणि पोलीस प्रशासनाला धारेवर धरुन शेतकऱ्यांची बाजू मांडली.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार पंडित पाटील व शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पोलीसांना रोखले. शेकाप व शेतकऱ्यांच्या आक्रमक भूमिकेसमोर प्रशासनाला अखेर नमावे लागले. त्यांनी मोजणीचे काम थांबवले. सरकारने दबाव टाकून अचानक प्रशासनाला जमिनीची मोजणी करण्यास भाग पाडले.

● सलग सुट्ट्यांमुळे पर्यटक मुरुडमध्ये दाखल झाले आहेत. काही पर्यटक समुद्रसफरीचा आनंद घेताना. (छाया- सुधीर नाझरे)

रेंट बाईकच्या विरोधात रिक्षाचालक पुन्हा आक्रमक

कारवाई करण्याची केली मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमध्ये रेंट बाईक व्यवसायिक व रिक्षाचालक यांच्यातील संघर्ष पुन्हा उफाळला आहे. शनिवारी सकाळी रिक्षाचालकांनी आक्रमक पावित्रा घेऊन दोन दुचाकी पोलीसांच्या ताब्यात दिल्या. हा व्यवसाय बंद करावा, अशी मागणी त्यांनी यावेळी पोलिसांना निवेदन देऊन केली.

नोकरी नसल्याने कर्ज काढून रिक्षा चालविण्याचा व्यवसाय अलिबागमध्ये येथील तरुण करीत आहेत. अलिबागमध्ये नोकरीनिमित्त येणारे कर्मचारी, ➤ पान २ वर

रिक्षाचालक संभ्रमात

दुचाकी भाड्याने देणाऱ्या व्यवसायिकांविरोधात कारवाईची मागणी होत आहे. मात्र पोलीस व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवितात. त्यामुळे नक्की कारवाई कुणी करावी असा संभ्रम रिक्षा व्यवसायिकामध्ये निर्माण झाला आहे.

अजितदादा म्हणाले, भडकावू भाषणे नकोत

। पुणे । वृत्तसंस्था ।

अलीकडे वाचाळवीरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रत्येकाला आपलं मत व्यक्त करण्याचा अधिकार संविधानानं दिला आहे. मात्र, अलिकडं कोणी काहीही बोलतो. अरेला कारे केले जाते. ही शिकवण ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांनी दिलेली नाही. असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कराडमध्ये बोलताना लगावला.

यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त पवार यांनी प्रीतिसंगम, कराड येथील समाधी स्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आरक्षणाबाबतीत काम सुरू आहे. कोणीही भडकावू भाषण करू नये. वाचाळवीरांनी समाजाम ध्ये तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असेही ते म्हणाले. सध्या दादांच्या गटाचे छगन भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात रोज कलगीतुरा चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर दादांचा सल्ला नेमका कोणाला अशी चर्चा आता होणार आहे.

राज्यात मराठा आरक्षणाचा विषय पेटलेला असतानाच अजितदादांना ➤ पान २ वर

आदित्य यान मुक्कामाजवळ

नवी दिल्ली- 'सूर्यावर स्वारी' करण्यासाठी भारतातर्फे पाठवण्यात आलेले आदित्य यान हे लवकरच एल-एक पॉईंटवर पोहोचणार असल्याची माहिती इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी दिली आहे. आदित्य यान अगदी सुस्थितीत असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

मआदित्य एल-वनफ ही भारताची पहिली सौर मोहीम आहे. सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आदित्य हे यान पृथ्वी आणि सूर्याच्या मध्ये असणाऱ्या एल-१ या मध्यवर्ती बिंदूवर ठेवण्यात येणार आहे. हा बिंदू पृथ्वीपासून सुमारे पंधरा लाख किलोमीटर दूर आहे. या ठिकाणाहून आदित्य यान सूर्याचा चोवीस तास अभ्यास करू शकणार आहे.

रायगड पोलीस संघ विजेता

कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात ४८ वी कोकण परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा पार पडली. या स्पर्धेत रायगड पोलीस दलाने सर्वसाधारण विजेतेपदावर विजयाची मोहर उमटवली. मान्यवरांच्या उपस्थितीत रायगड संघाला चषक देऊन गौरविण्यात आले.

गतवर्षीप्रमाणे यंदाही रायगडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. उत्कृष्ट मैदानी खेळाडू म्हणून रत्नागिरीमधील शितल पिंजरे व पालघरमधील आफताब सय्यद ठरले आहेत. त्यांना विशेष पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात सरखेल कान्होजी आंग्रे नगरीत व आरसीएफ क्रीडा संकुलामध्ये २० ते २५ नोव्हेंबरपर्यंत क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.

रायगड, नवी मुंबई आयुक्तालय, मिराभाईंदर आयुक्तालय, ठाणे ग्रामीण, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर या पोलीस दलातील ६८१ खेळाडूंनी स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत सात सांघिक व नऊ वैयक्तीक खेळाचे प्रकार होते. त्यात फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॉक्सींग, कुस्ती, कराटे, खो - खो, स्विमिंग अशा अनेक प्रकारच्या खेळांचा समावेश होता. पुरुष व महिला अशा वेगवेगळ्या गटात झालेल्या क्रीडा स्पर्धेत रायगड पोलीस दलातील संघाने विजयाची घोडदौड कायमच ठेवली. ➤ पान २ वर

ठाण्यातीलआगीत दोघांचा मृत्यू

ठाणे : येथील घोडबंदर रोडवर एका रहिवासी इमारतीला शनिवारी पहाटे लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील दोघांचा मृत्यू झाला असून अन्य तिघे जखमी झाले आहेत. अथक प्रयत्नांनतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळाले. मात्र ही आग नेमकी कशामुळे लागली, यामागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाघबीळ नाका परिसरात 'माधवी निवास'ही इमारत आहे. त्यातील पहिल्या मजल्यावर आज (शनिवार) पहाटेच्या सुमारास अचानक आग लागली. बघता बघता आगीने रौद्ररूप धारण केले. पहाटेची वेळ असल्याने घरातील सर्वजण गाढ झोपेत होते.

देशभरातील बोगद्यांची सुरक्षा तपासणी

कोकण रेल्वेची घेणार मदत

। मुंबई । वृत्तसंस्था ।
महामार्गांवरील बोगद्यांच्या बांधकामादरम्यानची सुरक्षा आणि उच्च दर्जाच्या मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी कोकण रेल्वे देशभरातील सर्व २९ निर्माणाधीन बोगद्यांचे सेफ्टी ऑडिट अर्थात सुरक्षा लेखा परीक्षण करणार आहे. याबाबतचा सामंजस्य करार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि कोकण रेल्वे कॉर्पोरेशन यांच्यात झाला आहे.

उत्तराखंडमधील बोगद्याचे काम सुरु असताना तो कोसळल्याने ४१ मजूर अडकून पडले होते. त्यामुळे बोगद्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी आता महामार्गावरील बोगद्यांच्या कामात कोकण रेल्वे सहकार्य करणार आहे. या करारांतर्गत कोकण रेल्वे महामंडळ हे राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या प्रकल्पांना सेवा प्रदान करणार आहे. ज्यामध्ये बोगदा बांधकाम आणि उतार स्थिरीकरणाशी संबंधित डिझाइन, रेखाचित्र आणि सुरक्षा पैलूंचा सर्वसमावेशक आढावा समाविष्ट आहे. याखेरीज कोकण रेल्वे बोगद्यांची सुरक्षा तपासणी देखील करणार आहे. आवश्यकता भासल्यास उपचारात्मक उपाय सुचविणार आहे. या व्यतिरिक्त कोकण रेल्वे आता महामार्ग अधिकाऱ्यांच्या क्षमता वाढीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम देखील घेणार आहे.

उत्तराखंडच्या घटनेनंतर महामार्ग विभागाकडून बांधल्या जाणाऱ्या बोगद्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला. बोगद्यात अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्याचे प्रयत्न अद्यापही सुरु आहेत. मात्र भविष्यात अशी दुर्घटना घडू नये म्हणून सावध भूमिका घेण्यात येत आहे.

मोदींची तेजस भरारी

। बंगळुरू । वृत्तसंस्था ।

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शनिवारी तेजस लढाऊ विमान चालवण्याचा अनुभव घेतला. आपल्या एक्स (ट्विटर) हँडलवरुन फोटो शेअर करत त्यांनी याबाबत माहिती दिली. या अनुभवामुळे आपला देशाच्या क्षमतेवरील विश्वास वाढला आहे. आपण खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर आहोत, असं मोदींनी म्हटलं आहे.

मोदींना बंगळुरूमधील हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडच्या कारखान्याला भेट दिली. यावेळी त्यांनी तेजस विमानाच्या निर्मिती प्रकल्पाची पाहणी केली. सोबतच त्यांनी तेजस विमानामध्ये भरारी देखील घेतली.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

साची निरव गडा, वाढदिवस, विद्यानगर अलिबाग

तळोजा औद्योगिक क्षेत्रात सांडपाणी वाहिनीची दुरुस्ती

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा सीईटीपी प्रकल्पातून प्रक्रिया झालेले सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची लांबी आणखी सुमारे साडेतीन किलोमीटर अंतराने वाढवण्यात येणार आहे. या संदर्भात औद्योगिक विकास महामंडळाने कामाला देखील सुरुवात केली आहे.कोपरा खाडीत या सांडपाणी वाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये ९५० कारखाने आहेत.यामध्ये ३५० पेक्षा जास्त रासायनिक कारखाने आहेत. कारखान्यांमधील रसायनमिश्रित सांडपाण्यावर सीईटीपीमध्ये प्रक्रिया केली जाते. १९९० - ९५ दरम्यान टाकण्यात आलेल्या जुनाट आणि जीर्ण झालेल्या या वाहिन्या नव्याने टाकण्याचे काम सुरु आहे.

विविध विभागाच्या परवानग्या मिळाल्यानंतर या कामाला आणखी गती प्राप्त होऊन वर्षभरात हे काम पूर्ण होणार असल्याची माहिती एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली. पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी तळोजा एमआयडीसी मधील प्रदूषण चव्हाट्यावर आणला. त्यानंतर एमआयडीसीमधील प्रदूषणाच्या विषयावरून खऱ्या अर्थाने चर्चा रंगू लागली. हरित लवादाने वेळोवेळी प्रदूषणकारी यंत्रणा आणि संबंधित आस्थापनांचे काम टोचले.या सर्व गोष्टींचा विचार करून एमआयडीसी केंद्र सरकारच्या एका संस्थेच्या शिफारशीनुसार, तळोजा औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या जलवाहिनीची लांबी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. वाघिवलीपर्यंत या जलवाहिनीचे विस्तारीकरण करण्यात येणार आहे. यासाठी एमआयडीसीकडून निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या कामाकरीता ७२ कोटी खर्च करण्यात येत आहेत. यापूर्वी सीईटीपी केंद्राचे देखील विस्तारीकरण करण्यात आले आहे.

यापूर्वी कोपरा खाडीत सोडले जाणारे हे प्रक्रिया केलेले पाणी पुढे वाघिवली खाडीत सोडले जाणार आहे. सध्याच्या घडीला कोपरा खाडीमध्ये या पाण्याची विल्हेवाट लावण्यात येत असल्याने खारघर, कामोठे, कळंबोली, रोडपाली, नावडे तळोजा या ठिकाणी दुर्गंधी पसरत आहे. नव्याने थेट वाघिवली खाडीत हे पाणी सोडले जाणार आहे. १६ मिटर लांब डिफ्युजर बसवला जाणार आहे. स्प्रिंकलरप्रमाणे तळोजा औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी समुद्रामध्ये विखुरले जाणार आहे.

खाडीतून जलवाहिन्या टाकणार

सध्या सीईटीपीमधून येणारी जलवाहिनी ही कोपरा खाडीपर्यंत आहे. जुनी वाहिनीही दुरुस्त केली जाणार आहे. नव्याने टाकण्यात येणारी वाहिनी ही खाडीच्या पाण्यातून अडीच ते तीन मीटर खोल टाकण्यात येणार आहे. त्यामुळे कांदळवनाचा ऱ्हास होणार नाही. त्याचबरोबर मासेमारी करणाऱ्यांनाही गैरसोयीला सामोरे जावे लागणार नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ३.३ किलोमीटर अंतराची ६.३० एमएम व्यासाची जलवाहिनी टाकणार आहे.

भरती ओहोटीच्या वेळी विल्हेवाट

राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था गोवा या संस्थेने परिसराचे सर्वेक्षण केले आहे. या ठिकाणच्या जैव विविधतेला धोका न पोहचवता हे सांडपाणी समुद्राच्या भरती ओहोटीड क्षेत्राच्या पुढे समुद्रात सोडले जाणार आहे. जेणेकरून ते वसाहतीलगत येणार नाही.

शेतकऱ्यांची लौकिक उद्योग समूहास भेट

। तळे । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील नव्याने स्थापन झालेल्या नवकृषक शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभासदांसाठी दिवेआगर येथील लौकिक या नावाने सुप्रसिद्ध असलेल्या आंबा पल्प प्रक्रिया उद्योगास भेट देण्यात आली सदर दौऱ्याचे आयोजन नवकृषक शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने करण्यात आले होते.

या प्रक्रिया उद्योगाचे मालक व उद्यान पंडित उदय बापट यांनी केलेल्या दर्जेदार उत्पादनामुळे व उत्कृष्ट चवीमुळे पूर्ण महाराष्ट्रामध्ये लौकिक हा व्यापारचिन्ह म्हणून ओळखला जातो. उदय बापट यांनी या उद्योगाविषयी मार्गदर्शन करताना पल्पसाठी आंबा खरेदी, आंबा मालाची प्रतवारी, आवश्यक यंत्रणा, ब्रॅडिंग, पॅकिंग, मूल्यवर्धन, उद्योग उभारणीसाठी आवश्यक परवाने,निर्यातक्षम पल्प उत्पादन, साठवणू व विक्री व्यवस्था नियोजन तसेच आंबा पल्प तयार करण्याविषयी पूर्ण प्रक्रिया आदींबाबत सविस्तर माहिती दिली.

रायगड जिल्यातील हापूस आंबा उशिरा येत असल्याने आंबा पल्प तयार करण्यासाठी कमी दरामध्ये आंबा मोठया प्रमाणात उपलब्ध होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे यांनी तळा तालुक्यात हापूस आंबा पिकाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून सदर आंबा प्रक्रिया उदयोग तालुक्यात ज्यास्तीत ज्यास्त उभारावेत यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील असल्याचे व प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया योजने अंतर्गत या प्रकल्पना आर्थिक सहाय्य करण्यात येणार असल्याचे सांगितले.

नवकृषक शेतकरी उत्पादक कंपनी राबवित असलेल्या व भविष्यातील उपक्रमाविषयी माहिती अध्यक्ष मधुकर वारंगे यांनी दिली. यानंतर राहुल जाधव वाकळघर यांच्या काजू प्रक्रिया युनिटला भेट देण्यात आली. या वेळेस राहुल जाधव यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. यावेळी उदय बापट, तालुका कृषी अधिकारी आनंद कांबळे, मधुकर वारंगे, मंडळ कृषी अधिकारी सचिन जाधव, श्रीवर्धन आत्माचे योगेश महाले, रमेश सपकाळ, प्रकाश मुंडे,आनंद घाग, राहुल जाधव,सचिव अंकित खेडेकर, नामदेव शिंदे उपस्थित होते.

दादा दांडेकर यांचे निधन

। रसायनी। वार्ताहर।

आपटा गावातील दत्तात्रेय मधुसुदन दांडेकर (८१) रा.आपटा बाजारपेठ यांचे शुक्रवार दिनांक २५/११/२०२३ रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.

ते एचओसी कंपनीचे माजी कर्मचारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले आहेत. आपटा गावात व एचओसी मध्ये ते दादा दांडेकर म्हणून प्रसिद्ध होते त्याचे आजोळ नेरे होते पनवेलच्या नेरे येथील गणपती उत्सवासाठी जात असत.

राजेंद्र जैन यांचा सत्कार

। कोर्लई । प्रतिनिधी ।

विमा क्षेत्रात सन. १९९९ पासून २५ वर्षे कार्यरत असलेले मुरूड मधील विमा प्रतिनिधी राजेंद्र फूटरमल जैन यांनी १४ वेळा आंतरराष्ट्रीय पातळीवर हा बहुमान प्राप्त केला. तसेच १०० पॉलिसीज पूर्ण करून या वर्षी रोहा शाखेत सर्वप्रथम शतकवीर हा बहुमान मिळविल्या बद्दल मुरूड जैन समाज मंदिरात रोहा शाखेचे शाखाधिकारी नरेश स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मागील २५ वर्षाच्या कारकिर्दीत त्यांचे विकास अधिकारी सुधीरकुमार यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सलग १४ वर्षे हा सन्मान मिळवून यावर्षी ही मानाची पदवी मिळवली. २५ वर्षात एकुण ३९०० पॉलिसीज पूर्ण करून त्या विमाधारकांना तत्पर आणि विनम्र सेवा देत आहेत.

या कार्यक्रमाप्रसंगी जैन समाजाम धील संचालक , त्यांचे विमाधारक आणि रोहा शाखेतील कर्मचारी सर्व कुटुंबीय उपस्थित होते. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.कार्यक्रमाचे औचित्य साधून सेवानिवृत्त मुख्याध्यापिका नैनिता कर्णिक यांनी आपल्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचे कौतुक म्हणून सेवानिवृत्त तहसीलदार नयन कर्णिक उभयतांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. डॉ. राज कल्याणी,भरत बेलोसे व सर्वांनी राजेंद्रचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

कर्नाळा किल्ला व अभयारण्याकडे पर्यटकांची वाढती गर्दी

। पनवेल । वार्ताहर ।

कर्नाळा किल्ला व अभयारण्याचा थंडीच्या मोसमात निसर्गाचा व ऐतिहासिक वस्तूचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढत असल्याने या परिसरातील इतर उद्योगांना सुगीचे दिवस आले आहेत. कर्नाळा किल्ला व अभयारण्याकडे पर्यटकांचा ओघ पुन्हा वाढू लागला आहे.

गतवर्षी फक्त ४० हजार २११ जणांनी भेट दिली होती. या वर्षी १० महिन्यांत तब्बल ५७ हजार ९८८ पर्यटकांनी भेट दिली आहे. ऐतिहासिक वारसा स्थळासह पक्षीनिरीक्षणाची संधी मिळत असल्यामुळे मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पुणेसह राज्यातून मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे हजेरी लावत आहेत.

पनवेलमधील प्रमुख पर्यटनस्थळांमध्ये कर्नाळा अभयारण्याचा समावेश होतो. परंतु, कोरोनानंतर या परिसरामधील पर्यटकांची संख्या कमी झाली होती. गतवर्षी पावसाळ्यात किल्ल्याचा भाग खचल्यामुळे किल्ल्यावर जाण्यास बंदी घातली होती. कर्नाळा किल्ल्याला इतिहासात विशेष महत्त्व आहे.

आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा या किल्ल्याचे किल्लेदार होते. किल्ल्यावरील सुळका, खडकात खोदलेली तळी, पुरातन वास्तूंचे अवशेष, दरवाजा पाहण्यासारखा आहे. या अभयारण्यात १३४ प्रकारचे स्थानिक व ३८ स्थलांतरीत पक्षी पहावयास मिळतात. ऑक्टोबर ते फेब्रुवारी ही पक्षीनिरीक्षणासाठी योग्य वेळ आहे. वनविभागाने निरीक्षणासाठी सुविधा उपलब्ध केल्या आहे. शिपाई बुलबुल, लालबुड्या बुलबुल, टकाचोर, राखी कपाळाची हारोळी, नारंगी डोक्याचा कस्तूर, निळा माशीमार, बाकचोच सातभाई, रानपारवा, पाचू होला, माशीमार, कोकीळ, रान धोबी, पांढऱ्या गालाचा कटुरगा, कोतवाल, फुलटोच्या, टोई पोपट, राखी कोतवाल, वेडा राघू, चष्मेवाला, करडा धोबी, ठिपकेवाला पिंगळा, शिंपी, तुरेवाला सर्पगरूड, जांभळा शिंजीर, तिबोटी धिवर, नील कस्तूर, नील दयाळ व इतर पक्षी पहावयास मिळणार आहेत. त्याच प्रमाणे विदेशी पर्यटक सुद्धा येथे आवर्जून भेट देतात व निसर्गाचा आनंद लुटतात त्यामुळे या भागात असलेल्या वेगवेगळ्या उद्योगांना सुद्धा सुगीचे दिवस आले आहेत.

त्रिपुरारी पौर्णिमेला सप्तक्रोशीत उत्सव

पोलादपूर : तालुक्यातील पहिली जत्रा सवाद येथील शंकरमहाबळेश्वर मंदिरामध्ये त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात येत असून आज रविवार, दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी या त्रिपुरा प्रज्वलनासोबतच या यात्रौत्सवाला सुरूवात होणार आहे.२६ नोव्हेंबरला कमळपूजनाने यात्रौत्सवाला प्रारंभ होऊन सायंकाळी ५ ते ७ या वेळेत सदगुरू महिला मंडळ सवादच्या महिलांचा हरिपाठ, सायंकाळी त्रिपुर आरती, रात्री सप्तक्रोशीतील ग्रामस्थांची भजने आणि यात्रोत्सवाची सुरूवात तसेच मध्यरात्री १२ ते पहाटे २ वाजेपर्यंत श्रीशंकर महाबळेश्वराची पालखी प्रदक्षिणा आणि पहाटेपर्यंत तमाशांचा जंगी सामना असे धार्मिक, सामाजिक व मनोरंजनाचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहीद दौड उपक्रमाचे पोलिसांनी केले स्वागत

। पनवेल । वार्ताहरा ।

२६/११ रोजी झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी तसेच या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अशोक कामटे स्मृती फाउंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी सांगली ते गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहिद दौड आयोजित करण्यात येते. त्याअंतर्गत यंदाच्यावर्षी आयोजन करण्यात आलेल्या दौडचे पनवेलमध्ये आगमन झाले असून त्यांचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वतीने पळस्पे पोलीस चौकी येथे स्वागत करण्यात आले.

परिमंडळ २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्वागत कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लोखंडे यांनी आयोजन केले होते. यावेळी अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजक श्रीकांत कुंभार, योगेश रोकडे. निलेश मिसाळ. घनश्याम डंके व त्यांच्या तीस जणांच्या पथकाचे पळस्पे येथे या दौडचे स्वागत केले. २६ नोव्हेंबर २००८ साली झालेल्या भ्याड हल्ल्यामुळे अनेक वरिष्ठ अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच निष्पाप नागरिक शहीद झाले होते. या भ्याड हल्याचा निषेध करुन श्रद्धांजली वाहण्यासाठी २००९ साला पासून अशोक कामटे स्मृती फाउंडेशनच्या माध्यमातून सांगली ने मुंबई गेट वे ऑफ इंडिया पर्यंत शहीद दौड आयोजित करण्यात येते. ४७० किलोमीटरची हि दौड असते यात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतात.

दौडच्या माध्यमातून देशद्रोहींना संदेश देतात की, तुम्ही पुन्हा हल्ल्याचा प्रयत्न कला तर तुम्हाला संपवू असा इशारा देण्यात येतो. यावेळी बोलताना परिमंडळ २ चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी सांगितले की, आजची तरुण पिढी अशा प्रकारच्या उपक्रमामध्ये सहभागी होत असल्याने त्यांचा जोश उत्साह वाढविण्याचे काम प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यावेळी बोलताना वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी सांगितले की, २६/११ रोजी झालेल्या हल्ल्याच्या वेळेस मी स्वतः तिथे उपस्थित होतो. सलग चार दिवस तेथे कर्तव्य बजावत असताना वेगवेगळ्या घटना, हल्ले स्वतः अनुभवले आहे. या हल्ल्यामुळे अनेक जण शहीद झाले. अशा प्रकारचे धाडस यापुढे कुठलाही देश यापुढे करणार नाही हे आपण जगाला दाखवून दिले आहे. आयोजक श्रीकांत कुंभार यांनी सुद्धा आजची तरुण पिढी देश प्रेम सर्वात प्रथम बघते हे दिसून येते. आज आमच्या अकादमीमध्ये इयत्ता दहावी पासून उच्च शिक्षित मुले सहभागी झाले असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांसह यांच्यासह पळस्पे पोलीस चौकीचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

जरांगेंबाबत भूमिका बदलली?

होते. आंदोलकांचा मात्र त्याला विरोध होता. त्यातूनच एक सप्टेंबर रोजी वातावरण चिघळले व स्थानिकांनी पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी त्याला जबाब म्हणून लाठीमार केला व त्यात अनेक जण जखमी झाले. जरांगे व आंदोलकांनी मात्र पोलिसांनी जबरदस्ती व लाठीमार केल्यानेच स्थानिकांनी दगडफेक केल्याचा दावा सातत्याने केला आहे. लाठीमाराच्या घटनेचे राज्यभर हिंसक पडसाद उमटल्याने जरांगे एकदम प्रसिध्दीच्या झोतात आले. त्यामुळे गेले दोन महिने मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटला आहे. त्यावेळी दगडफेक करणाऱ्यांवर कोणतीही पोलिसी कारवाई केली जाऊ नये अशी जरांगे यांची मागणी होती व सरकारने ती यापूर्वी मान्य केली होती. लाठीमाराचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असा आरोप झाला होता. शिवाय या प्रकरणी पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते.

आता मात्र दोशी यांना पुण्यात नियुक्ती देण्यात आली आहे. शिवाय त्याच्या दुसऱ्याच दिवशी दगडफेक प्रकरणी आरोपींना अटक झाली आहे. दोशी यांची नियुक्ती स्थगित ठेवावी असे पत्र शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवले होते. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातील शिंदे गटाची नाराजी समोर आली होती.

रेंट बाईकच्या विरोधात रिक्षा चालक पुन्हा आक्रमक

कामगार तसेच पर्यटकांमुळे रिक्षा चालकांना रोजगार मिळत आहे.

मात्र अलिबाग शहरासह परिसरात भाड्याने दुचाकी देण्याचा व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. त्या विरोधात पेणच्या उपप्रादेशिक परिवहन विभागाने यापुर्वी कारवाई केली आहे. तरीदेखील खुलेआमपणे तो सुरु आहे. अलिबाग पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर राजरोसपणे हा व्यवसाय चालत आहे. त्याचा परिणाम अलिबागमधील रिक्षा चालकांच्या व्यवसायावर होत आहे. रिक्षाचालक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय चालविणारे मालक धनदांडगे व सेवानिवृत्त अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यास स्थानिक पोलीस टाळाटाळ करीत आहेत, असा आरोप रिक्षाचालकांनी केला आहे. हा व्यवसाय बंद करावा अशी मागणी सातत्याने होत आहे. तरीसुध्दा त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे रिक्षा चालकांचे म्हणणे आहे.

शनिवारी पर्यटकांना भाड्याने दिलेल्या दुचाकी, अलिबागमधील रिक्षा चालकांनी पोलिसांच्या ताब्यात दिल्या. या दोन्ही दुचाकींची पीयूसी व विम्याची मुदत संपलेली होती. दुचाकी भाड्याने देणाऱ्यांविरोधात कारवाई करा अशी मागणी रिक्षा चालकांनी पोलीसांकडे केली. मात्र आम्ही कारवाई करू शकत नाही, आमची जबाबदारी नाही असे सांगून संबंधित पोलिसांनी वेळकाढूपणा केला.

पोलिसांच्या या भूमिकेबाबत रिक्षाचालक संतापले. कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी अलिबाग ऑटो रिक्षा व्यावसायिक संघटनाचे माजी अध्यक्ष शेखर पाटील, अध्यक्ष शरद राऊत, अफझल सय्यद, संजय जाधव, संदेश चेवले, मन्सूर आगा आदी पदाधिकाऱ्यांसह रिक्षा चालक उपस्थित होते.

गुन्हेगारीसाठी दुचाकींचा वापर झाल्यास...

अलिबाग शहरासह परिसरात दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय सुरु आहे. या व्यवसायाला कोणतीही परवानगी नसल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी यापुर्वीच स्पष्ट केले आहे. पर्यटकांना भाड्याने देण्यात येणाऱ्या दुचाकी सुस्थितीत नसल्याचे आढळून आले आहे. या दुचाकींचा वापर गुन्हेगारीसाठी झाल्यास जबाबदार कोण असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अन्यथा तीव्र आंदोलन करणार

दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय अनधिकृत आहे. याबाबत वारंवार आवाज रिक्षा चालकांनी उठवला आहे. त्यामुळे दुचाकी भाड्याने देणाऱ्या चालकांकडून उलट रिक्षा चालकांविरोधात खोट्या तक्रारी केल्या जात आहेत. खोटया गुन्ह्यात त्यांना अडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे. असा आरोप करण्यात आला आहे. हे कदापि सहन करणार नाही. कारवाई केली नाही, तर तीव्र आंदोलन करू त्याला पोलीस व उपप्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारीच जबाबदार राहतील असा इशारा अलिबाग ऑटो रिक्षा व्यावसायिक संघटनेकडून देण्यात आला आहे.

रायगड पोलीस संघ विजेता

स्पर्धेतील पुरुष गटातील कबड्डीची अंतिम लढत रायगड पोलीस व नवी मुंबई यांच्यामध्ये झाली. त्यामध्ये रायगड संघाने चार गुणांनी आघाडी मारून विजय संपादन केला. शनिवारी या स्पर्धेचा समारोप झाला. त्यावेळी रायगड संघाला सर्वसाधारण विजेते , नवी मुंबई संघाला द्वीतीय व रत्नागिरी संघाला तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले.

यावेळी मिराभाईंदरचे अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, नवी मुंबई आयुक्तालय, मिराभाईंदर आयुक्तालय, ठाणे ग्रामीण, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर येथील पोलीस अधिकारी, खेळाडू व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

अजितदादा म्हणाले, भडकावू भाषणे नकोत

डेंग्यू झाल्याने तो राजकीय आजार असल्याची चर्चा झाली होती. त्यावरही पवारांनी पहिल्यांदाच आपल्या खास शैलीत उत्तर दिले. ममी लेचापेचा माणूस नाही. गेले पंधरा दिवस डेंग्यूमुळे आजारी होतो. राजकीय आजार माझ्या स्वभावात नाही. मी माझी मते गेली ३२ वर्षे स्पष्टपणे मांडत असतोफ, असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांच्या टीकेचा समाचार घेतला. तर अमित शाहांना कोणतीही तक्रार करण्यासाठी भेटलो नव्हतो असे स्पष्टीकरणही त्यांनी दिले.

दोन वेगवेगळ्या अपघातात सहा जखमी

माया प्रकाश जाधव, विलास सखाराम महाडिक आणि मनीषा प्रकाश मोहिते असे चार जण जखमी झाले. त्याचबरोबर नडगाव गाव येथे शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास मुंबई ते खेड जाणारी वॅगनर कारचा पुढचा टायर फुटल्याने ती बाजूच्या डिव्हायडरवर आपटली. या अपघातात चालक महेश सुधाकर गुडे, प्रवासी रवींद्र देसाई दोन्ही राहणार मुंबई जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलिस शाखा महाड यांनी घटनास्थळी दाखल झाले.

महाडमध्ये घरफोडी

या आपले सासरे व मुलासोबत याच इमारतीतील वरच्या मजल्यावर राहत होत्या. याच संधीचा फायदा घेऊन चोरट्यानी हे बंद घर फोडून ही धाडसी चोरी केली. तपासासाठी पोलिसांकडून श्वानपथकाची मदत घेतली जाणार आहे. या घटनेचा अधिक तपास महाड शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

मे. वाय एल मेश्रामसो
पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधीश
सिनीयर डिव्हीजन सो. याचे पुणे येथे
कोर्टात किरकोळ अर्ज नं. १८४६/२०२२
नि ०७
अर्जदार

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त, अर्जदार यांनी इंडियन सेक्शन कलम अन्वये या कोर्टाकडे मयत मुनिरा युसूफ धोराजीवाला यांचा मृत्यू दिनांक ११/०२/२०२२ यांचे हेअरशिप सर्टिफीकेट मिळण्यासंबंधीचा अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावावयाची असेल त्याले नेमलेली तारीख ०१.१२.२०२३ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता स्वत: किंवा वकीलामार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक : ०९/११/२०२३ सही व शिक्क्यानिशी दिला.

हुकूमान्वये
सही
अधिक्षक
दिवाणी न्यायालय पुणे

शिक्का

आरक्षणासाठी ओबीसी समाज संघटनेची एकजूट

ओबीसी-मराठा समाजासाठी एकत्र येणार

। नेरळ । वार्ताहर ।

आरक्षणावर अन्य कोणाचेही अतिक्रमण नको, असा निर्धार तालुक्यातील कर्जत ओबीसी संघटनेना केला आहे. ओबीसी संघटनेची एक संयुक्त बैठक कर्जत येथे पार पडली. दोन समाजात तेढ निर्माण होऊन सामाजिक वातावरण दूषित होऊ नये यासाठी प्रयत्न करण्यावर बैठकीत शिक्कामोर्तब झाले.

तालुका आगरी समाज संघटनेने पुढाकार घेत २३ नोव्हेंबर रोजी सदरची बैठक बोलवली होती. सभेत तालुक्यातील ओबीसी समाजातील विविध जातीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सभेचे अध्यक्ष म्हणून कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष सुरेश टोकरे होते. या सभेला भटक्या विमुक्त जातीचे राष्ट्रीय पदाधिकारी भगवान चव्हाण, सावळाराम जाधव, वसंत कोळंबे, भगवान चव्हाण, अनिल जोशी, दिलीप शिंदे, मनोज मानकामे, केतन पोतदार, सुशांत बदले यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यात सुरु असलेल्या आरक्षण प्रश्नाबाबत सुरेश टोकरे यांनी आपली रोखठोक भूमिका मांडली. ओबीसीमधील सर्व जातींची जनगणना व्हावी, तालुक्यातील ओबीसी समाजातील सर्व जातींच्या संघटनांनी अशा बैठका घेवून सर्व ओबीसी समाजाला एकत्र आणण्याचे प्रयत्न करावे, तालुक्यातील ओबीसी आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी एका व्यक्तीचे नाव निश्चित करावे अशी सूचनादेखील टोकरे यांनी केली.

भटक्या विमुक्त मोर्चाचे राष्ट्रीय सचिव भगवान चव्हाण यांनी यावेळी मराठा समाजाला सरकारने आरक्षण द्यावे. आम्ही त्याचे स्वागत करतो. मात्र त्यांना ओबीसीमधून आरक्षण देऊ नये, असे आवाहन केले. कुणबी समाज हा ओबीसीमध्ये समाविष्ट असून त्यांना आमचा विरोध नाही, पण जे कुणबी नाहीत. त्यांना कोणत्या कायद्याने तुम्ही आरक्षण देणार, असा सवाल चव्हाण यांनी केला. बहुजन समाजाने आपल्यातील मतभेद दूर करून एकत्र यायला हवे. देशात सुरू असलेले षडयंत्र उधळून लावण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी ज्येष्ठ विचारवंत वसंत कोळंबे यांनी आरक्षण विषयावर सखोल मार्गदर्शन केले आणि आपली भूमिका स्पष्ट असली पाहिजे असे मत मांडले.

आपल्या मागण्यांचे निवेदन शासनाला देण्याची सूचना संतोष पेरणे यांनी या बैठकीत सर्व ओबीसी नेत्यांना केली. मराठा आणि आगरी समाज हे कर्जत तालुक्यातील मोठे समाज असून प्रामुख्याने या समाजात आरक्षणाच्या मुद्द्यावर दुही निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन पेरणे यांनी केले.

रस्त्यांची कामे लवकर पूर्ण करण्याची माथेरानकरांची मागणी

। माथेरान । वार्ताहर ।

धूळ विरहीत रस्त्यांना एकमेव उत्तम पर्याय म्हणून सनियंत्रण समितीच्या परवानगीने क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांची कामे एमएमआरडीएच्या माध्यमातून सुरू होती. परंतु गावातील काही महत्वाच्या ठिकाणी पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना हेतुपुरस्सर राजकीय खोडा घातला होता. त्यामुळे रस्त्याला आवश्यक असणारे सामान जागेवर असताना देखील ही कामे पूर्ण होऊ शकली नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करीत आहेत.

ज्या ठिकाणी आवश्यकता होती त्याठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते न करता अन्य ठिकाणी जिथे कधीही कोणत्याही प्रकारची वर्दळ अथवा रहदारी नसते.तिथे क्ले पेव्हरचे रस्ते केवळ वैयक्तिक आकसापोटी बनविले गेले आहेत. त्यामुळे आता स्थानिक नागरिक सुध्दा वैतागून गेले आहेत. आम्हालाही क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते हवे आहेत अशी विनवणी करताना दिसत आहेत.

कंत्राटदाराने धूळ विरहित रस्ते करण्यास टाळाटाळ केली होती. त्यामुळे दूरवर राहणाऱ्या स्थानिकांना रात्रीअपरात्री घरी जाताना अंधाऱ्या काळोखात चाचपडत जावे लागते. पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी सुध्दा काही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. निदान यापुढे होणारी रस्त्यांची कामे उत्तम प्रकारे पूर्ण करावीत अशी मागणी स्थानिक करीत आहेत.

वरसगाव- विळे मार्गावरील कॉईल ट्रेलरची वाहतूक नागरिकांच्या जीवावर

। कोलाड । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील वरसगांव फाट्यावरून विळे भागाड येथील पोस्को कंपनीकडे कॉईल वाहतूक करणाऱ्या ट्रेलरच्या अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यावर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

वरसगांव फाट्यावरून विळेकडे जाणारा मार्ग हा पूर्णपणे डोंगर दऱ्या व वेड्यावाकड्या वळणांनी व्यापला आहे. त्यामुळे अपघात घडण्याची हमखास शक्यता असते.वरसगांव ते विळे भागाड येथे पोस्को कंपनीकडे कॉईल भरून जाणारे बहुतांश ट्रेलर चालक हे मोबाईलवर बोलत असतात. त्यामुळे त्यांचे समोरून येणाऱ्या वाहनांकडे लक्ष जात नाही आणि अपघाताच्या घटना घडतात. त्यामध्ये निरपराध नागरिकांचा बळी जातो. हा रस्ता रुंद करण्यात यावा, किंवा या मार्गावरील कॉईल ट्रेलरची वाहतूक थांबवावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विश्वास बागुल यांनी दिला.

अन्यथा शिक्षकांचे वेतन रोखणार

■ शाळेची माहिती अद्ययावत करण्याचे आदेश ■ माहिती भरण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंतची मुदत

। रायगड । प्रतिनिधी ।

यू-डायस प्लस ऑनलाईन प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत न करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबवण्यात यावे, असे आदेश समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांना येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी लागणार आहे.

राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार, ८८ टक्के शाळांनी भौतिक माहिती अद्ययावत केलेली आहे. ७६ टक्के शाळांमधील शिक्षकांची माहिती अंतिम करण्यात आली असून, ७१ टक्के विद्यार्थ्यांची माहिती अंतिम झालेली आहे.

त्यामुळे समग्र शिक्षा, स्टार्स व पीएम श्री योजनेचे वार्षिक नियोजन करण्यास विलंब होत आहे.शाळांकडून माहिती अद्ययावत होत नसल्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षकांचे वेतन अदा करू नये. जिल्हा व तालुका स्तरावरील वेतन पथकांनी शाळांकडून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षक यांची सर्व माहिती अद्ययावत केल्याचे मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घ्यावे. त्यानंतरच वेतन अदा करण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

पक्षफुटीनंतर प्रथमच शरद पवार येणार नवी मुंबईत

। नवी मुंबई । वार्ताहर ।

राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि खासदार शरद पवार रविवारी (ता. २६) नवी मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी ते नेरूळ येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधतील. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार हे पहिल्यांदाच नवी मुंबईत येणार असल्याने ते कोणत्या मुद्द्यांवर बोलतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मेळाव्यात नवी मुंबई राष्ट्रवादीतर्फे बचत गटाच्या महिलांना विशेष स्थान असून ३०० गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप केले जाणार आहे, अशी माहिती कार्याध्यक्ष जी. एस. पाटील यांनी दिली.

या मेळाव्याच्या नियोजनाकरिता नवनिर्वाचित अध्यक्ष व माजी नगरसेवक चंद्रकांत पाटील यांनी एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला जी. एस. पाटील, माजी नगरसेवक राजू शिंदे, संदीप सुतार यांच्यासह नेतेमंडळी व कार्यकर्ते उपस्थित होते. मेळाव्याला खासदार सुप्रिया सुळे, आमदार जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, मेहबूब शेख आदी मुख्य नेत्यांची उपस्थिती लाभणार आहे.पक्षात झालेल्या फुटीनंतर पहिल्यांदाच येणार असल्याने शरद पवार कोणाचा समाचार घेतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या चंद्रकांत पाटील यांच्याकडे राष्ट्रवादीची नवी मुंबई शहराची नेतृत्वाची धुरा देण्यात आली आहे. येणाऱ्या काळातील विधानसभा, लोकसभा आणि मनपा निवडणुका या अनुषंगाने राष्ट्रवादीकडून ताकद आजमावली जाणार आहे.

'मोरा-मुंबई रो रो' ला जुलैचा मुहूर्त

मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांचा दावा

। उरण । वार्ताहर ।

मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या मार्गावरील रो रो जलसेवेच्या मोरा जेट्टीचे काम मागील सहा महिन्यांपासून बंद आहे. मात्र असे असले तरी लवकरच या रो- रो च्या कामाला सुरुवात करून जुलै २०२४ च्या निश्चितवेळी मार्ग सुरू होईल असा दावा महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

२०१८ ला मंजूर झालेल्या मोरा (उरण) ते मुंबई (भाऊचा धक्का) दरम्यानच्या रो रो सेवेचे काम निधीअभावी रखडले आहे. मागील सहा महिन्यांपासून या जेट्टीवर एकही दगड पडलेला नाही. मात्र जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. उरणमधील नागरिकांसाठी आपल्या खाजगी वाहनांसह मुंबईत ये-जा करता यावे या करीता मोरा ते मुंबई रो रो सेवा सुरू करण्यात येणार आहे. या जलसेवेच्या कामाला सुरुवात झाली आहे. या जलमार्गाचे काम अनेक वर्षे रखडल्याने या कामाचा अंदाजित ५० कोटींचा खर्च वाढून ७५ कोटीवर पोहचला आहे.

उरणकरांसाठी वाहनासह जलप्रवासाचा उत्तम पर्याय

उरणच्या मोरा व मुंबईतील भाऊचा धक्का दरम्यानच्या रो रो जलप्रवासात उरणच्या नागरिकांना आपले चारचाकी व दुचाकी वाहन घेऊन मुंबईत जाता येणार आहे. त्यामुळे वाहनासह उत्तम प्रवासाची सोय उपलब्ध होणार आहे.

मोरा पोलीस ठाणेनजीक जेट्टीचे काम सुरू असून दगडांचा भराव करून जेट्टी बांधण्यात येत आहे. उरणवरून मुंबईत ये -जा करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या रो रो जेट्टीच्या कामाला आधीच विलंब झाला आहे. त्यामुळे ही सेवा कधी सुरू होणार असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. रो रो सेवेचे काम बंद झाले नसून जेट्टीचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला बील न दिल्याने तसेच मध्यंतरी दगड खाण बंदीमुळे काम थांबले होते. मात्र कंत्राटदाराला त्याचे बील देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा जेट्टीचे काम सुरू करून २०२४ च्या निश्चित केलेल्या वेळेत पूर्ण होईल अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

माथेरानमध्ये मासिक स्वच्छता मोहीम

। माथेरान । वार्ताहर ।

शहरामध्ये फक्त सुशोभीकरण नव्हे तर शहरामध्ये सातत्याने स्वछता असणे आवश्यक असून स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ योगेश म्हसे यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांना दिले आहेत. त्या अनुषंगाने माथेरानमध्ये मासिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या अभियानात माथेरान नगरपालिकेनी सातत्याने आपला सहभाग नोंदवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिलेला आहे. यासाठी मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान शहर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला. यावेळी पॅनोरमा हॉटेल ते अहिल्याबाई होळकर चौक पर्यंतचा रस्ता साफसफाई आणि गटारातील कचरा उचलण्यात आला. यात रस्त्यात पडलेली झाडे , गटारत पडलेल्या बाटल्या काढून गटारे साफ करण्यात आली. यावेळी एकूण एक टन कचरा सुमारे ५० कर्मचारी वर्गाच्या साहाय्याने उचलून शहर स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता अभियानात नगरपरिषदेचे अधिकारी स्वछता निरीक्षक नरेंद्र सावंत, वरिष्ठ लिपिक प्रविण सुर्वे, अन्सार महापुळे, ज्ञानेश्वर सदगीर यांच्यासह रामचंद्र चव्हाण, कैलास सोनावळे आणि सर्व सफाई कामगार वर्ग उपस्थित होता.

सेंद्रिय शेती गटाने बांधले वनराई बंधारे

। चिरनेर । वार्ताहर ।

पाणी अडवा पाणी जिरवा, ही संकल्पना राबवणे काळाची गरज आहे. शेतकरी आणि पशुपक्ष्यांसाठी वरदान ठरणारे वनराई बंधारे बांधण्याची गरज लक्षात घेऊन चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय गटातर्फे दोन वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांना पाण्याचा वापर करता येणार आहे.

तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ-नारनवर, मंडळ कृषी अधिकारी किसन शिगवण, श्री महागणपती सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष तथा कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषी सहाय्यक अधिकारी सुरज घरत यांच्या मार्गदर्शनाखाली बंधारे उभारण्यात आले.

दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. मात्र ते पाणी छोट्या-मोठ्या नद्या, ओढ्यांमध्ये जाते. त्यानंतर नद्या नाले कोरडे पडतात. वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून पाणी अडविले, तर काही महिने या पाण्याचा वापर करणे शक्य आहे. तसेच भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

> **प्रत्येकाने आपले नैतिक कर्तव्य म्हणून पाणी अडविले पाहिजे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जिवंत राहू शकत नाही. पशुपक्षी, झाडे, शेती मानवासाठी पाण्याची आवश्यकता असते.**
> **–अर्चना सुळ–नारनवर, उरण तालुका कृषी अधिकारी**

> पाण्याचे महत्त्व जाणून घेऊन बंधारा बांधून पाणी अडविले पाहिजे. या पाण्याचा वापर गुरे, वन्यप्राणी यांना पिण्यासाठी होत असतो. शिवाय शेतकरीवर्गाला भाजीपाल्याचे उत्पन्न घेता येते. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते. त्यासाठी ग्रामपंचायत तसेच कृषी विभागाने या संदर्भात लक्ष घालून ही संकल्पना राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.
> -प्रफुल्ल खारपाटील, अध्यक्ष, श्री महागणपती सेंद्रिय शेती गट, चिरनेर

सहा वर्ष पूर्ण झाली तरी

वाशिष्ठी नदीवर बंधारा नाहीच

। चिपळूण । वार्ताहर ।

वाशिष्ठी नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यासाठी एमआयडीसीने २५ कोटीचा निधी २०१७ मध्ये मंजूर केला होता ; मात्र नागरिकांचा विरोध असल्याचे कारण देत जलसंपदा विभागाने बंधारा बांधण्याकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. सहा वर्षानंतर आता चिपळूण शहरातील सर्वपक्षीय नागरिकांनी वाशिष्ठी नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्याची मागणी केली आहे.

लोटे परशुराम उद्योजक संघटनेच्या मागणीची दखल त्यावेळी घेतली असती, तर आज नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधून तयार झाला असता, असे आता बोलले जात आहे. चिपळूण शहराजवळून वाहणाऱ्या वाशिष्ठी नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी लोटे परशुराम उद्योजक संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. प्रशांत पटवर्धन यांनी केली होती. वाशिष्ठी नदीतून वाहणारे सुमारे २४ एमएलडी पाणी एमआयडीसी उचलते आणि ते उद्योजकांना पुरवते.

त्याशिवाय चिपळूण शहर आणि परिसरातील गावांच्या पिण्याची पाणी योजनासुद्धा याच नदीवर अवलंबून आहे. सध्या कोयनेच्या वीजनिर्मितीवर मर्यादा असल्यामुळे ही नदी कोरडी पडली आहे. त्यामुळे निम्म्या चिपळूण शहराला अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत.

तत्कालीन पर्यावरणमंत्री रामदास कदम, सुभाष देसाई यांच्याकडे पाठपुरावा करून २५ कोटीचा निधी मंजूर करून घेण्यात आला होता. नदीवर बंधारा बांधण्यासाठी स्थानिक नागरिकांचा विरोध असल्याचे जलसंपदा विभागाने कळवल्यानंतर ही मागणी मागे पडली. पाणी साठवण्यासाठी नदीवरील जुना पूल न तोडता तेथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्याची मागणी आता पुढे आली आहे. २०१७ मध्ये मंजूर झालेल्या बंधाऱ्याची निविदा प्रक्रिया होऊन काम सुरू झाले असते, तर मागील सहा वर्षात बंधाऱ्याचे काम पूर्ण होऊन चिपळूणचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला असता.

> **नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यात यावा, ही मागणी आम्ही गेले कित्येक दिवस करत आहोत. त्यासाठी शासनाकडून २५ कोटीचा निधीही मंजूर करून घेतला होता. हा बंधारा झाला असता तर चिपळूण शहर आजुबाजूची गावे आणि उद्योजकांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला असता.**
> **– डॉ. प्रशांत पटवर्धन, अध्यक्ष, उद्योजक फेडरेशन संघटना, रत्नागिरी जिल्हा**

घरोघरी 'शुभमंगल सावधान'चे स्वर

। उरण । वार्ताहर ।

कार्तिक शुद्ध द्वादशीपासून घरोघरी तुळशी विवाह करण्याची प्रथा पुरातन काळापासून प्रचलित आहे. उरण परिसरात तुळशीची गौरीप्रमाणे पूजा करतात. तिला साडीचोळी, नथ, सोन्याचे दागिने घालतात. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीची जोडवी, खणा-नाराळाने ओटी भरतात. तुळशीला नैवद्याचे गोड पदार्थ प्रत्येकजण परंपरेनुसार करतात. शिवाय हार, फुलांनी सजवलेल्या तुळशीवृंदावनासमोर पाटावर ठेवलेल्या बाळकृष्णाची मूर्तीमधे अंतरपाट धरत 'शुभमंगल सावधान' म्हणत घरोघरी विवाह सोहळे रंगत आहेत.

हिंदू पंचागांनुसार कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वादशीला तुळशी विवाह केला जातो. या दिवसापासून तुळशीच्या लग्नाला सुरुवात होते. यंदा २४ नोव्हेंबरपासून तुळशी विवाहाला सुरवात झाली आहे. उरणमधील शहरी तसेच ग्रामीण भागात या विवाहाची धामधूम पाहायला मिळत आहे. ग्रामीण भागात घरासमोरील अंगणात तुळशी वृंदावनाजवळ शेजारी व आप्तस्वकीयांना घेऊन लग्न लावले जाते. लग्न लागल्यावर शेवबुंदीचा प्रसाद वाटला जातो. तर फ्लॅट संस्कृतीत देखील गच्चीवर किंवा बाल्कनीमध्ये तुळशी विवाह होत आहेत. परंपरा जपण्यावर

अधिक भर दिला जात आहे. उरण शहरात हा तुलसी विवाह सामूहिक पद्धतीने देखील होत आहेत. त्यामुळे लहान-थोर एकत्र येत असल्याने वेगळाच उत्साह नागरिकांमध्ये पाहायला मिळत आहे.

पाच दिवस धामधूम

तुळसी विवाहाची ही धामधूम तब्बल पाच दिवस पाहायला मिळणार आहे. अशातच उरण सारख्या सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध असलेल्या शहरात तुळशी विवाह झाल्याशिवाय कोणत्याही पद्धतीचा विवाह पार पडत नाही. त्यामुळे तुळशी विवाहानंतर घरोघरी लग्नसराईची धामधूम सुरू होणार असून यंदा २७ नोव्हेंबरपासून मुहूर्त असल्याने विवाहेइच्छुकांसाठी सुवर्णसंधी आहे.

'कोळी समाजाला दाखले मिळणार'

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

सरकारने कोळी समाजाचे अनेक प्रश्न सोडवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोकण विभागातील कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे दाखले मिळत नव्हते. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वपूर्ण भूमिका घेत आदिवासी मंत्री यांचा विरोध डावलून दाखले मिळण्यासाठी उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात येणार आहे. या समितीचा अहवाल कोळी समाजाच्या बाजूनेच येणार आहे. त्यामुळे कोळी समाजाला दाखले मिळणार आहेत असे कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश पाटील यांनी सांगितले.

रेवदंडा येथे जागतिक मच्छिमार दिनाचे औचित्य साधून भाजपा मच्छिमार सेल व कोळी महासंघाच्या वतीने मच्छिमार बांधवांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी रेवदंडा जेट्टी येथे आ. पाटील यांच्या स्थानिक विकास निधीमधून कोळी बांधवांसाठी बांधण्यात आलेल्या निवारा शेडचे लोकार्पण यांच्या हस्ते करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमासाठी भाजपा मच्छिमार सेलचे महाराष्ट्र अध्यक्ष ॲड. चेतन पाटील, सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष मनोहर बैले, कोळी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, देवानंद भोईर, संतोष पाटील, जयवंत अंबाजी, मनोहर मकु, अभय पाटील, राजेंद्र चुनेकर, देवानंद गोगर, अनुजा पाटील, भालचंद्र वरसोलकर, ताराचंद कोंडे, प्रवीण तांडेल, सूर्यकांत वाघमारे आदी मान्यवर व विविध मच्छिमार संस्थांचे चेअरमन मोठ्या संख्येने

रोटरी क्लबतर्फे किल्ले स्पर्धा

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली येथील रोटरी क्लबच्या वतीने किल्ले बनवण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेसाठी दहा किल्ले निवडण्यात करण्यात आले होते. स्पर्धेचे हे चौथे वर्ष होते. स्पर्धेमध्ये बाल मित्र मंडळ, वर्धमाननगर प्रथम क्रमांक, स्वामी समर्थ नगर येथील मुलांनी द्वितीय क्रमांक तर ओंकार भावे मित्र मंडळवरची खोपोली व दत्तकृपा सोसायटीवरची खोपोली यांना विभागून तृतीय क्रमांक देण्यात आला. जिल्हाप्रांतपाल मंजू फडके यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्षा डॉ सावित्री रघुपती, ऋतुजा भोसले, अब्बास कोठारी, मिलिंद बोधनकर, प्रकल्प प्रमुख संजय पाटील उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

प्रोसेस फी रू. प्रो जा.क्र.६४३/२३

अर्जदारातर्फे वकील ॲड.विजय अनंत पेढवी

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश व स्तर यांचे न्यायालयांत

दिवाणी चौकशी अर्ज नं १८५/२०२३
नि ८/ड

१ श्रीमती सीमा प्रकाश गुर्जर व इतर — अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जातील सीमा प्रकाश गुर्जर रा.कल्याणी अपाटमेंट, फ्लॅट नं.१०१, १०२, बालाजी मंदिरजवळ, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड यांनी कै.प्रकाश हरी गुर्जर हे दि.१४.०१.२०२३ रोजी ते उपचारादरम्यान अलिबाग येथे मयत झाले असून त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांना वारस म्हणून श्रीमती सीमा प्रकाश गुर्जर, श्री.राजेंद्र प्रकाश गुर्जर, श्री.वैभव प्रकाश गुर्जर हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. कै.प्रकाश हरी गुर्जर यांच्या मालकीची मौजे अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड येथील कल्याणी अपार्टमेंट या इमारतीतील तळ मजल्यावरील वाणिज्य गाळा मालमत्ता क्र.दुकानी गाळा नं. १२८२अ (Z1MKT001548) जुना मालमत्ता (ALB000001546) एकूण क्षेत्र ११.१८ चौ.मी. ही मिळकत आहे. सदर मिळकतीसंबंधी त्यांना मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम II प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी या न्यायालयांत अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरील मिळकतीसंदर्भात वर उल्लेख केलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध, मालकी, वहिवाट, कुळ, ताबा, कब्जा, तारण, गहाण, लीज, लिन अथवा कसल्याही प्रकारचा हक्क असल्यास किंवा त्यांना वारस दाखला मिळणेबाबत कोणाची काहीही, कसलीही हरकत नाही असे समजून, वरील अर्जदार यांना वारस दाखला जाहीर करण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक २०.११.२३ रोजी, माझे सहीने आणि या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

अलिबाग,
दिनांक :

सही/-
लिपीक
दिवाणी न्यायालय व स्तर
अलिबाग-रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर
अलिबाग-रायगड

अर्जदाराचे वकील ॲड.संपदा मनोज पाटील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग सो.,यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.२६२/२०२३

श्री.वैभव गजानन तांडेल — अर्जदार

विरूद्ध

ग्रामपंचायत आक्षी — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै.बाळ्या सुमा तांडेल यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कामी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांचे आजोबा कै.बाळ्या सुमा तांडेल यांचा मृत्यू दि.१५/०६/१९४७ रोजी साखर, ता.अलिबाग जि.रायगड येथे झालेला आहे. परंतु सदर सालचे मृत्यू रजिस्टर ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नाही. परंतु आज रोजी अर्जदार यांना शासकीय/निमशासकीय कामाकरीता अर्जदार यांचे आजोबा कै.बाळ्या सुभा तांडेल यांच्या मृत्यूच्या दाखल्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्याकामी अर्जदार यानी अलिबाग येथील मे. मुख्यन्यायदंडाधिकारी सो. अलिबाग यांचे न्यायालयात मृत्यूचा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.२०/१२/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे कोट अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कायद्याने अर्जदार यांचे आजोबा कै.बाळ्या सुमा तांडेल यांचा मृत्यूनोंद दाखला देणेकामी संबंधीत ग्रामपंचायत/नगरपरिषद कार्यालयात आदेश दिला जाईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ८/११/२०२३ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपिक
मुख्यन्यायदंडाधिकारी सो.अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
प्र.अधिक्षक
मुख्यन्यायदंडाधिकारी सो.अलिबाग

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड

'छत्रपती शिवाजी महाराज-सारथी जिल्हास्तरीय वसतिगृह संकुल योजना' अंतर्गत खाजगी वसतिगृह चालविणेसाठी नोंदणीकृत संस्थांकडून रायगड जिल्ह्याकरीता अर्ज मागविणेसाठी

जाहिरात

छत्रपती शाह महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतिगृहे संकुल योजना' अंतर्गत खाजगी नोंदणीकृत संस्थाकडून महाविद्यालयातील मुले/मुलीसाठीचे वसतिगृह चालविण्यास अर्ज मागविण्यात येत आहे. याकरीता अर्ज करणारी इच्छुक संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा, १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच अशा संस्थेचे किमान ३ वर्ष लेखापरिक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. रायगड जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज वसतिगृह असलेल्या खाजगी नोंदणीकृत संस्थांना यामध्ये प्राधान्य देण्यात येईल.

संस्था निवडीसाठीचे पात्रता निकष, अटी व शर्ती या सारथी संस्थेच्या https://sarthimaharashtragov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध केलेली आहे. परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रासह कार्यालयीन वेळेत दाखल करण्याची शेवटची तारीख १५/१२/२०२३ ही आहे. उशिराने प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अर्ज दाखल करण्याचा पत्ता : उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी,
विभागीय कार्यालय सारथी मुंबई
पत्ता-MTNL इमारत, रेनट्री मार्ग, सेक्टर-२१ खारघर,
तालुका-पनवेल, जिल्हा महाराष्ट्र ४१०२१०
दूरध्वनी क्र. ०२२-२७७४१०११
ईमेल- divmumbaisarthi@gmail.com
संपर्क- श्रीमती कादंबरी कदम (प्रकल्प अधिकारी)
९६१९९१२२९४

सही/-
जिल्हाधिकारी, रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-धामोते, ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल इम्रान कादीर गुलबार रा.कौसा मुंब्रा जि.ठाणे सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मालकांचे नाव	स.नं./हि.नं नंबर	क्षेत्र चौ.मी.	आकार रू.पै.
मतिन रज्जाक लगड व इतर	३५/१	०-३३-४० पैकी स्वतःचा सामाईक अविभक्त हिस्सा	३.८१

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारसहक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट, अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ॲड.अशोक पालू डुकरे
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं.१०१,
ममदापुर रोड, नेरळ, ता.कर्जत जि.रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्रीमती सुनंदा मधुकर गावंड, वगैरे, राहणार नवेदर कोळगाव, सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकतीपैकी ०-२२-०० आर्स शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, पारंपारिक वहीवाटीच्या हक्कासहीत माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती सुनंदा मधुकर गावंड, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	गट नं.	हि.नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
सासवणे, ता.अलिबाग.	३१६	०	०-६०-९० एकूण	०३-६०

सदरील मिळकतीपैकी रस्त्यालगतची सुमारे ०-२२-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २५/११/२०२३.

सही/
(ॲड. संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

मा. इंदलकर साहेब कोर्ट प्रोसेस जमा ता. — ॲड. रेणूका मि. पाटील अर्जदारांचे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात..

दि. चौ.अर्ज क्र. १५०४/२०२३, निशाणी नं. ८/ड, ने. ता. ०४/१२/२०२३

कै. नागीबाई गोविंद निघुकर तर्फे वारस
कै. बेंमटीबाई गोविंद निघुकर लग्नापुर्वीचे नाव
कै बेंमटीबाई बळीराम माळी तर्फे वारस(मुलगी)
१) श्री रामा बळीराम माळी, वय-५० वर्षे, धंदा- शेती
रा. विठठल मंदिरासमोर खेरणे, देविचाचाडा, ता. पनवेल, जि. रायगड,
२) कै. अनंता बळीराम माळी (मयत)
श्री सुनील अनंता माळी, वय-४५ वर्षे, धंदा- शेती
रा. विठठल मंदिरासमोर,खेरणे, देविचापाडा, ता. पनवेल, जि. रायगड.
३) कै. बारकु बळीराम माळी मयत तर्फे वारस
श्री गणेश बारकू माळी, वय-४९ वर्षे, धंदा- नोकरी
रा. विठठल मंदिरासमोर,खेरणे, देविचाचाडा, ता. पनवेल, जि. रायगड.
४) सुलोचना बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)
श्रीमती सुलोचना लहू भोईर, वय- ५२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. १९/८, विदया निकेतन रोड, मराठी शाळेजवळ,
डोंबिवली,पूर्व, माणगाव, मानपाडा, ठाणे, महाराष्ट्र,)४२१२०४
५) श्रीमती बेबीबाई बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)
श्रीमती बेबीबाई शांताराम खानावकर, वय- ६२ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. कानपोली, ता. पनवेल, जि. रायगड
६) श्रीमती अनुबाई बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)
श्रीमती अनुबाई बाबुराम गोंधळी, वय- ६० वर्षे, धंदा- गृहिणी
रा. विठठल मंदिरासमोर,खेरणे, देविचा पाडा, ता. पनवेल, जि. रायगड.
७) श्रीमती निर्मला बळीराम माळी (ल्ग्नापुर्वीचे नाव)
श्रीमती निर्मला बबन पाटील, वय- ७३ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. ११८, वॉटर टॅक जवळ, मोर्बे, ता. पनवेळ, जि. रायगड
..अर्जदार

विरूद्ध

कै. शेवंता गोविंद निघुकर (लग्नापुर्वीचे नाव)
कै. शेवंता महादु पोरजी मयत तर्फे वारस
श्री मुकुंद महादु पोरजी, वय- वर्षे, धंदा- नोकरी
रा. घोट, कॅम्प ता. पनवेल, जि. रायगड
२)सौ. अनिता साईनाथ डागंडे, वय- वर्षे, धंदा- नोकरी
रा. केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड
..सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. नागीबाई गोविंद निघुकर हया दि. २५/०८/१९९८ रोजी मु. कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झालेले असून त्यांच्या मृत्यु पश्चात त्यांना अर्जदार १) श्री रामा बळीराम माळी २)श्री सुनील अनंता माळी ३) श्री गणेश बारकू माळी४) सुलोचना बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)श्रीमती सुलोचना लहू भोईर५) श्रीमती बेबीबाई बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)श्रीमती बेबीबाई शांताराम खानावकर६) श्रीमती अनुबाई बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)श्रीमती अनुबाई बाबुराम गोंधळी७) श्रीमती निर्मला बळीराम माळी (लग्नापुर्वीचे नाव)श्रीमती निर्मला बबन पाटील व सामनेवाला १) श्री मुकुंद महादु पोरजी २)सौ. अनिता साईनाथ डागंडे हे कायदेशिर वारसदार आहेत. कै.नागीबाई गोविंद निघुकर यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी अर्ज कलेला आहे.

मिळकतीचे वर्णन -
मौजे-घोट ता. पनवेल, जि. रायगड.

अनु.क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार रु.पै.
१	६४	६	०-४४-१	१.७६
२	६६	५	०-३८-४	३.९४
एकुण	०-८२-५ क्षेत्र			

वरील मिळकत हि कै.नागीबाई गोविंद निघुकर यांच्या वडिलोपार्जित मिळकत असून अर्जदार व सामनेवाला हे यांचे कायदेशिर वारस आहेत अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. नागीबाई गोविंद निघुकर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २२/११/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

लिपिक
दि.न्या.क.स्तर पनवेल

कोर्टाचा शिक्का

सहाय्यक अधीक्षक
दि.न्या.क.स्तर पनवेल

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे चांदई, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक संभाजी रामचंद्र कांबेरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
६९/४	०-३०-६०	०-५९

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/११/२०२३

ॲड.समीर आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी
पत्ता-गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळमजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१
मोबाईल नंबर ९१५८३१३७३३

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, रायगड यांचे कार्यालय
मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयाचे आवरात, अलिबाग ४०२ २०१
दुरध्वनी क्र. ०२१४१-२२२४८२८, email:dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.६८/२०२३/ता.पोलादपूर/जि.रायगड/२०२३ अलिबाग दिनांक २३/११/२०२३/४०३६

जाहीर नोटीस

प्रति,
१.श्रीमती बयोबाई सहादेव पवार — अपीलदार
रा.तुर्भे बुद्रुक, ता.पोलादपूर, जि.रायगड
तर्फे कुलमुखत्यारी
श्रीमती शितल सहदेव गोळे

विरूद्ध

४. उपअधिक्षक भूमि अभिलेख, पोलादपूर — जाबदार
ता.पोलादपूर, जि.रायगड
५. श्री.शांताराम श्रीधर गोळे
रा.तुर्भे बुदुक, ता.पोलादपूर, जि.रायगड

विषय : मौजे तुर्भे बुद्रुक, ता.पोलादपूर, जि.रायगड येथील सर्व्हे नं. ११६/१ अ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ : १.अर्जदार श्रीमती बयोबाई सहादेव पवार तर्फे कुलमुखत्यारी श्रीमती शितल सहदेव गोळे यांचा दि.२२.०८.२०२३ रोजीचा अपील अर्ज.
२.इकडील पत्र क्र अपील एस.आर. ६८/२०२३/ता.पोलादपूर/जि.रायगड /२०२३/जा.क्र. ३७४७ अलिबागा, दि.१८/१०/२०२३

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करून घेणेकामी सुनावणीचा तारीख ०७.११.२०२३ व २१.११.२०२३ रोजी नेमणेत आलेली होती तथापि जबादार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीने अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख ०५/१२/२०२३ नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मूळ कागदपत्रांसह जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :अलिबाग
दिनांक : २३/११/२०२३

सही/-
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
रायगड, मु.अलिबाग,

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ श्री.सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी, धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)

■ English Speaking प्रमोशनमध्ये, बिझिनेसमध्ये, मुलाखतीमध्ये, परीक्षांमध्ये, कोर्सेसमध्ये सुयश पैसा देणारा मौल्यवान शॉर्ट कोर्स. परवडणारी फी- ९८२२८४२८१०

■ प्रथम, घटस्फोटित, विधुर, विधवा, व्यंग सर्वजातीय स्थळांसाठी रोहा, गणेश महाकाळ : ८८८८९३५७७५

■ शुभमुहुर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नोंदणी ४२ शाखा, वेबसाईट - ९२२६७६६१२९

■ ऑफिससाठी ६००० चौ.फूट जागा भाड्याने मिळेल. संपर्क :- रोकडे - ९२२६३७९८४४

■ नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. रेस्टॉरंट व किचन मॅनेजर २. ऑल राऊंडर कूक ३.नाश्ता बनवणारा कूक ४. हेल्पर कूक ५.नाईट शिफ्ट हाऊस किपींग २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५ /७८७५८६६५५५

■ लग्नासाठी वर पाहिजे आहे. वधूचे वय :- २२, ठिकाण : अलिबाग, मोबाईल नं. ७५०७९०९४३१, बायोडाटा या मोबाईल नंबरवर पाठवणे.

■ नोकरीची संधी अलिबाग बीचजवळ 'अतिथी प्युअर व्हेज' हॉटेलमध्ये 'वेटर' पाहिजेत. संपर्क : ८००७२२२७२७

■ पत्रावळी पेपर डीश मशीन विक्री आमच्याकडे पत्रावळी, पेपर डिश, मशीन मिळतील. तसेच सिल्व्हर व ग्रीन पेपर मिळेल. मुद्रा इंटरप्रायझेस पेण संपर्क : ८२३७४२४१२४

■ अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. पात्रता : दहावी/बारावी पास कॉम्प्युटर येणे आवश्यक संपर्क:- ९९७०५०९४४०

■ विद्यानगर परिसरात एक 1BHK व एक 2BHK प्लॉट त्वरीत विकणे आहे. संपर्क विरेंद्र पवार - ९४२२६९००५८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

प्लास्टिकबंदीच्या अंमलबजावणीत अडचणी

। पनवेल । वार्ताहर ।

परंतु पनवेल शहरातील छोट्या-मोठ्या विक्रेत्यांकडे पिशव्यांचा सर्रास वापर होत असल्याने पालिका प्रशासनाकडून प्लास्टिकबंदीच्या अंमलबजावणीत विविध अडचणी येत आहेत.

प्रदूषण संवर्धनाच्या अनुषंगाने राज्यातील प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रणासाठी राज्य सरकारने बंदीचा निर्णय घेतला आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्रदूषण रोखणे, या दृष्टिकोनातून राज्य सरकारने २०१८ मध्ये प्लास्टिकबंदीचा निर्णय घेतला आहे. पण त्याची कठोर अंमलबजावणीअभावी हा निर्णय पूर्णत: फसल्याचे चित्र आहे. जवळपास पाच वर्षांपासून प्लास्टिक वापरावर बंदी आहे.

ईअर-बड्स, फुग्यांना लावलेल्या प्लास्टिकच्या काड्या, प्लास्टिकचे झेंडे, गोळ्या, चॉकलेटला लावलेल्या प्लास्टिकच्या काड्या,आईस्क्रीमलालावलेल्याप्लास्टिकच्या काड्या, सजावटीसाठी वापरला जाणारा थर्मोकोल, प्लास्टिकच्या ताटल्या, कप, पेले, काटे-चमचे, सुऱ्या, स्ट्रॉ, ढवळण्याच्या काड्या, ट्रे, मिठाईच्या खोक्यांवरील वेष्टणे, सिगारेटची पाकिटे या प्लास्टिकजन्य वस्तूंवर बंदी असताना त्याचा वापर केला जात आहे.

पनवेल शहर व वसाहतीमधून प्लास्टिक बंदी केवळ नावापुरतीच उरल्याचा प्रत्यय तळोजा येथील सिडको डम्पिंग ग्राऊंडवरील असलेल्या प्लास्टिक पिशव्यांवरून दिसत आहे. पालिकेच्या घंटागाडीतून आणलेल्या पिशव्यांचा खच पडला असून कापडी पिशवी घेऊन जाण्याची सवय कारवाईअभावी पुन्हा मोडली असल्याचे दिसत आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने पुन्हा एकदा सक्रिय होण्याची गरज आहे.

अशी आहे दंडाची तरतूद

शहरातील नागरिक, दुकानदार, व्यापारी वर्गाला ७५ मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे तसेच सिंगल यूज प्लास्टिक आढळल्यास त्यांच्यावर प्रथम वेळेस पाच हजार, दुसऱ्या वेळेस आढळल्यास रक्कम दहा हजार दंड ठोठावला जातो; मात्र तिसऱ्या वेळी आढळल्यास २५ हजारांचा दंड आणि तीन महिन्यांचा कारावास अशा प्रकारे कायदेशीर कारवाई करण्यात येते. यात प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक कव्हर असलेले मिठाईचे बॉक्स, थर्माकोल व डिस्पोजेबल प्लास्टिकचे ताट, कप, प्लेट, ग्लास आदींचा समावेश आहे.

अंमलबजावणी आवश्यक

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्लास्टिक उपवास या अनोख्या विषयावर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्यात आली. तसेच वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरणपूरक उत्सव, ऊर्जेची बचत, हवामान बदलाची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवणे याबरोबरच प्लास्टिक किती हानीकारक आहे, याचीदेखील माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने पालिका क्षेत्रात प्लास्टिक वापर सुरूच आहे.

विकसित भारत संकल्प यात्रा रथ मार्गस्थ

। रायगड । वार्ताहर ।

भारत सरकारची विकसित भारत संकल्प यात्रा ही देशव्यापी मोहीम केंद्र शासनाकडून आखण्यात आली आहे. यात्रा दि.१५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२४ या कालावधीत पार पडणार आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने विकसित भारत संकल्प यात्रा योजनेच्या रथाला (२३) नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांनी हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आला.

विविध योजनांतर्गत पात्र असलेल्या परंतू आतापर्यंत लाभ न घेतलेल्या लोकांपर्यंत पोहोचणे, माहितीचा प्रसार आणि योजनांबद्दल जागरुकता निर्माण करणे, सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांशी संवाद साधणे, यात्रेदरम्यान निश्चित केलेल्या तपशीलांद्वारे संभाव्य लाभार्थ्यांची नोंदणी करणे ही विकसित भारत संकल्प यात्रेची मुख्य उद्दिष्टे आहेत. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के आदींसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विकसित भारत संकल्प यात्रा रथ अलिबाग, पनवेल, खालापूर, रोहा, तळा, श्रीवर्धन, महाड या सात तालुक्यांमध्ये जाणार आहेत.

जल्लोष खाकी वर्दीतील दर्दीचा कार्यक्रमाचे आयोजन

। पनवेल । वार्ताहर ।

नवी मुंबई पोलिसांच्या वतीने जल्लोष खाकी वर्दीतील दर्दींचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सहभागी झालेल्या पोलीस अधिकारी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील कलाकार सदस्यांचा बुधवार (२२) आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचा कुटुंबातील सदस्यांच्या त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचा संकल्प नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी केला. पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना येणारा ताण तणाव त्यातून काहीसं बाहेर पडावा हाही त्या पाठीमागचा उद्देश होता. याप्रसंगी सर्वांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. अशाच प्रकारचे कार्यक्रम उपक्रम पोलीस आणि त्यांच्या कुटुंबीयांकर्ता राबविण्यात येणार असल्याची ग्वाही पोलीस आयुक्तांनी यावेळी दिली.

पाण्याअभावी लागली झाडे करपू

। उरण । वार्ताहर ।

सिडकोने उरणला जोडणार द्रोणागिरी नोड ते पागोटे या पाच किलोमीटरच्या सागरी महामार्गावर जवळपास एक कोटी रुपये खर्च करून चार हजार नारळाच्या झाडांची लागवड केली आहे. पावसाळ्यानंतर ही नारळाची वृक्ष पाण्याविना करपू लागली आहेत. त्यामुळे सागरी महामार्गाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या नारळाच्या झाडांचे हाल होऊ लागले आहे.

तालुक्यातील सिडकोने द्रोणागिरी नोड परिसरातील रस्त्यांवर विविध प्रकारची झाडे लावण्याचा संकल्प शासनाच्या माझी वसुंधरा माध्यमातून हाती घेतला आहे. त्या धर्तीवर पागोटे भेंडखळ करंजा बंदर या द्रोणागिरी नोड परिसरातील कोस्टल रस्त्यांवर जवळपास एक कोटी रुपये खर्च करून नारळाची झाडे लावली आहेत.

पावसामुळे या झाडांना पाण्याची आवश्यकता नव्हती. सध्या प्रचंड ऊन पडू लागल आहे. या उन्हाच्या तडाख्यात ही झाडे पाण्याविना करपू लागली आहेत.

दुसरीकडे रस्त्याच्या कडेला उगवलेल्या गवताला वारंवार आगी लागण्याच्या घटना घडत आहेत. याच ठिकाणावरून गॅस वाहिन्या जात असल्याने आग लागणे धोकादायक बनणार आहे. सिडकोने कोस्टल मार्गावर नारळाची झाडे वाचविण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी उरण म धील निसर्गमित्र महेश घरत यांनी केली आहे.

चारा, पाण्यासाठी मेंढपाळांची भटकंती

। पनवेल । वार्ताहर ।

घाटमाथ्यावरून पश्चिम महाराष्ट्रातील मेंढपाळांचे तांडे कोकणातील सह्याद्री पर्वताच्या पट्ट्यात दाखल झाले आहेत. पनवेल-खोपोली मार्ग, पाली-खोपोली राज्य महामार्ग, पेण-अलिबाग मार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर चारा-पाण्यासाठी शेळ्या व मेंढ्यांचे कळप गावोगावी कुटुंब कबिल्यासह भटकंती करताना दिसत आहेत.

मान्सूनचा पाऊस सुरू होताच कोकणातील मेंढपाळ परतीच्या प्रवासाला लागतात. पावसाचा जोर कमी होताच साधारणतः ऑक्टोबर-नोव्हेंबर ते पुढे जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात मेंढपाळ कोकणात येतात. यंदा पश्चिम महाराष्ट्रासह संपूर्ण महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने नोव्हेंबरमध्येच पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. खेचरावर आपला संसार घेऊन मेंढ्या जगवण्यासाठी कुलदैवत खंडोबा, बाबीरदेव सतोबा, विरोबा आणि विठोबाचे पारंपरिक धार्मिक खेळ उरकून चाऱ्याच्या शोधात मेंढपाळांचा कोकणाच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे. शेळ्या-मेंढ्या, घोडे, कोंबड्या, राखणदार कुत्रे यांचाबरोबर कुटुंबाचा उदरनिर्वाह शेळ्या-मेंढ्या जगवण्यासाठी मैलोन् मैल पायपीट करून कोकणाकडे कूच केले आहे. अशातच दिवाळीच्या आसपास कोकणातील भात पिकाची कापणी होते. त्याच वेळी सातारा, कोरेगाव, फलटण, सांगली, सांगोला, व माणदेशातील मेंढपाळ कोकणातील पनवेल, सुधागड, पाली, महाड, रोहा, पोलादपूर, भागात विसावताना दिसत आहेत.

कारवणी पद्धतीचा आधार

हिवाळ्यात मेंढपाळ शेळ्या-मेंढ्यांचा मोठा कळप घेऊन आल्यावर दिवसा-रात्री आपले बिऱ्हाड एखाद्या शेतात घेऊन बसतात. शेळ्या-मेंढ्याचे मूलमूत्र शेतात पडून शेतीची सुपीकता वाढण्यास मदत होते. त्याला कारवणी पद्धत म्हणतात. कोकणात पूर्वीपासून चालत आलेली कारवणी पद्धत आजही आपले अस्तित्व टिकवून असल्याचे दिसते. कारवणी पद्धत मेंढपाळांना जगवत आहे. शेळ्या-मेंढ्यांच्या लेंडीखताला मोठी मागणी असते. शेतजमीन अधिक कसदार होऊन उत्पादनात वाढ व्हावी याकरिता शेतकरी मेंढपाळांना दरवर्षी स्वतः हून बोलावून शेळ्या-मेंढ्या शेतात बसवल्याने शेतकऱ्याकडून तांदूळ व पैसे बिदागी दिली जाते.

साप्ताहिक राशिभविष्य दि. २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२३

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

समस्या सुटण्याची शक्यता

मेष : मेष राशीधारकांना एकूण ग्रहमान पाहता आपल्या पुष्कळशा समस्या या सप्ताहात सुटण्याची शक्यता आहे, मात्र त्या दृष्टीने आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. कामात अधिक लक्ष द्या. सरकारी नियमांचे पालन करा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः छाती, पोट, डोळे यांच्या विकारांपासून सावध राहा. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे अथवा संपर्काचे योग संभवतात. विरोधकांची धास्ती बाळगू नका. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपणास ग्रहांची अनुकूलता लाभणार असल्याने आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना चांगला काळ राहील. निकाल आपल्या बाजूने लागेल. **महिलांना :** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. **शुभ दिनांक : २७,०२.**

चिकाटीने काम करा

सिंह : सिंह राशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना :** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न करावे. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **शुभ दिनांक : २८,०१.**

खर्चात वाढ होण्याची शक्यता

धनु : धनु राशीसाठी या सप्ताहात आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांनाबढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्येपाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा.अंमवशा असताना घरात वाद घालू नका. **महिलांना :** हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यानची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक : २४,२५.**

इतरांशी नाराजी टाळा

वृषभ : वृषभ राशीसाठी या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** कोणाशीही नाराजी पत्करू नका. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल **शुभ दिनांक : २६,१.**

गुंतवणूक करताना सल्ला घ्या

कन्या : कन्या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. अनाठायी खर्च करण्याचे टाळावे. कठीण परिस्थितीत हुशारीने, चतुराईने पुष्कळ गोष्टी साध्य करता येतील. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विध्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. **महिलांना :** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. नाही. **शुभ दिनांक : २७,३०.**

नवी संधी मिळण्याची शक्यता

मकर : मकर राशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपल्या हुशारीने व कौशल्याने आपले अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न कराल व त्यात यशस्वी व्हाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. काहींना विवाहाचे योगही संभवतात. नको त्या प्रलोभनात मात्र अडकू नका. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने सामोरे जा. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणालाही नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास हा सप्ताह सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल व वरिष्ठांची चांगले संबंध ठेवता येतील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. राजकीय क्षेत्रात आपले नाव होण्याची शक्यता राहील. मात्र आपल्या भावी योजनांबद्दल गुप्तता पाळणे हितकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल्यास यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना :** कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी संधी मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभ दिनांक : २८,२९,**

विचारपूर्वक निर्णय घ्या

मिथुन : मिथुन राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान आपणास मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना :** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्न करा. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **शुभ दिनांक : २८, २९.**

वाद-विवाद टाळा

तुळ : तुल राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवन्याचा प्रयत्न करा.आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने आभ्यासा बाबत दुर्लक्ष करू नको **महिलांना :** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे. **शुभ दिनांक : २९,२.**

स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा

कुंभ : कुंभ राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण आपली कर्तव्ये काय आहेत याचा विचार करून त्यांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून कोणतेही काम केल्यास बऱ्याच प्रमाणात यशस्वी होऊ शकाल. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सामाजिक क्षेत्रात वाहवा मिळवू शकाल. कोर्ट व शेतीविषयक कामांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. शुभकार्याचे संकेत मिळतील. सरकारी नियम कटाक्षाने पाळा. आपण कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास आपणास चांगले समाधान मिळू शकेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. **महिलांना :** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक : ३०,०१**

संघर्षाचे प्रसंग टाळा

कर्क : या सप्ताहात कर्क राशीधारकास या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलांना :** . प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांन कडून चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक : ३०,२.**

स्वतःकडे लक्ष द्या

वृश्चिक : वृश्चिक राशीसाठी या सप्ताहात इतरांपेक्षा स्वतःकडे अधिक लक्ष द्या. आपल्या मनाला जे पटेल ते योग्य समजून वागणे योग्य ठरेल. आपल्या योजना स्वतःपुरत्या ठेवा. त्याची वाच्यता करू नका. आपले उद्दिष्ट पुढे ठेवून ते गाठण्याचा प्रयत्न करा. एक उद्दिष्ट ठेवून ते साधण्यासाठी प्रयत्नशील राहा. महिलांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामे करता येतील. प्रकृतीची पथ्ये पाळा. रागावर नियंत्रण ठेवा. मुलांच्या विकासाकडे लक्ष द्या. मित्रमंडळींच्या संपर्कात राहा. पहिले तीन दिवस प्रथम सत्रात प्रकृतीबाबत जागरूक राहावे. दंतविकार, उष्णतेचे विकार याकडे लक्ष द्या. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांची मने दुखावणार नाही, याची काळजी घ्या आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. मोठ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा. विरोधकांना न दुखवता आपले कार्य साध्य करा. कायद्याचे पालन करा. नियम व कायदे यांचे पालन करा खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. **महिलांना :** अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभ दिनांक : ३०,०१.**

कामाचे कौतुक होईल

मीन : हा सप्ताहात मीन राशीसाठी विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **महिलांना :** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभ दिनांक :** २७,२९.

मोहोर

'अंतिम' मानहानी

विनायक दळवी

कळसाला (क्लायमेक्स) पोहोचल्यानंतर पराभवाचे दुःख अधिक असह्य असतं. आपल्या भारतीय क्रिकेट संघांचं देखील असंच झालंय. ११ पैकी १० सामने सहज एकहाती, फारसा संघर्ष न करता जिंकल्यामुळे कच्चे दुवे उघडे पडलेच नाहीत. त्यामुळे त्यावरची उपाययोजना विचारात आली नाही. 'विनिंग कॉम्बिनेशन ब्रेक' न करण्याच्या नादात आपण तेच ११ खेळाडू, तोच संघ मैदानात उतरवून खेळत राहिलो. परिस्थितीनुसार संघात बदल केले पाहिजेत हे क्रिकेटचे मूळ तत्वच विसरलो. आर. आश्विन या ऑफस्पिनरची ऑस्ट्रेलियाला ॲलर्जी आहे हेही विसरलो. ऑस्ट्रेलियन संघांतील अधिक डावखुऱ्या फलंदाजांची संख्याही विसरलो.

अंतिम सामन्यात रोहित शर्माच्या झंझावाती फलंदाजीनंतर ५० षटकांच्या सामन्यात खेळतोय हेही विसरलो. खेळपट्टी संथ आहे, त्यावर कसे खेळायला हवे हेही विसरलो. एकेरी-दुहेरी धावा वेगात पळायच्या असतात हेही विसरलो. याआधीच्या मैदानांवरील छोट्या अंतराच्या सीमारेषांवर चौकार-षटकारांची बरसात करण्याची सवय जडल्यानंतर अहमदाबादच्या दूरवरच्या सीमारेषांपलिकडे चेंडू कसा पाठवायचा हेही विसरलो. सातव्या षटकात ऑस्ट्रेलियाला ३ बाद ४७ असे कोंडित पकडल्यानंतर यांच्यावरील दडपण वाढवायला विसरलो. याआधीच्या १० सामन्यात आपण कसे खेळलो होतो हेही विसरलो. खरंतर विश्वचषकाचा अंतिम सामनाच तुम्हाला आम्हाला क्रिकेटपटूंनाही विसरायचाय. नको त्या आठवणी असे वाटते. एव्हरेस्टवर प्रथम पाय ठेवणाऱ्या हिलरीचे नाव सर्वांना ठाऊक आहे, नंतर पोहोचलेल्या शेर्पा तेनसिंगच्या नावाची फारशी दखल घेतली जात नाही. आपल्या संघाबाबतही अगदी तसंच होतंय. त्याआधीच्या १० सामन्यातील कामगिरीच विस्मरणात गेलीय.

असं का झालं! या प्रश्नाची अनेक उत्तरे आहेत. फक्त क्रिकेटपुरताच विचार केला तर भारतीय संघांने ४५ दिवसांच्या या स्पर्धेत फॉर्म लवकर पकडला होता. सर्व संघांच्या आधी आपण सलामीच्या सामन्यातच विजेत्या ऑस्ट्रेलियाला हरविले होते. विजेत्या ऑस्ट्रेलियाची या स्पर्धेत पहिला दोन सामन्यात पराभवाने सुरूवात झाली. मुंबईत तर ७ बाद ९१ अशा परिस्थितीत नाबाद द्विशतक झळकावून मॅक्सवेलने आपल्या संघाला विजेतेपदासाठी आवश्यक असणारी ईर्ष्या, जिद्द निर्माण करून दिली. भारतीय संघ ४००च्या जवळपास धावा फटकावित असतानाही त्यांच्या गोलंदाजांनी आपल्यावर दडपण येऊ दिले नाही. मॅक्सवेल सारख्या काम चलाऊ फिरकी गोलंदाजाकडून त्यांनी फक्त विकेटच काढून घेतल्या नाहीत तर १०-१० षटकांचे संपूर्ण स्पेल गोलंदाजी करण्याची मुभा ही दिली. तेवढा विश्वासही दाखविला.

उपांत्य फेरीत ट्रॅव्हिस हेडसारख्या गोलंदाजाने चेंडू आणि बॅटच्या तडख्याने सामन्यातच कलाटणी दिली. तोच ट्रॅव्हिस हेड त्यांना अंतिम फेरीत फलंजदाजीत पूर्णपणे फळला. त्याच्या शतकाने भारताची विजयासाठी झुंज देण्याची अशाच संपुष्टात आणली.

आपण आपल्याच देशात, फिरकीला पोषक खेळ्यापट्टीवर ऑस्ट्रेलियाची कोंडी का करू शकलो नाही. आपल्याच खेळ्यपट्टीवर झंपा व मॅक्सवेल या कामचलाऊ फिरकी गोलंदाजाला डोक्यावर बसविले, संथ खेळपट्टीवर त्यांचे आखूड टप्प्याचे चेंडू खेळून काढले. खेळ्यपट्टीवरचा संथ वेग कारणीभूत होताच. पण ऑस्ट्रेलियाने दूरवर पसरलेल्या सीमारेषेच्या या मैदानातील मैदानी क्षेत्ररक्षण देखील कारणीभूत होते. लबुशेत निवृत्तीकडे झुकलेला वॉर्नर, ट्रॅव्हिल हेड यांनी मैदानाच्या मोकळ्या भागातील केलेले अंतिम क्षेत्र रक्षणच भारताच्या धावसंख्येला ब्रेक लावणारा ठरला. भारतीय संघांने खेळपट्टीही योग्य रितीने परखली नव्हती. कारण संथ खेळपट्टीवर कशी फलंदाजी करावी हे ऑस्ट्रेलियापेक्षा आपल्यालाच अधिक ठाऊक होते. पण लाभ घेतला ऑस्ट्रेलियाने त्यांनी त्यांचे दोन पार्टटाईम फिरकी गोलंदाज योग्य रितीने वापरले. एरव्ही क्लब क्रिकेटमध्येही त्यांची दहशत नाही अशांना आपणच डोक्यावर बसविले. चेंडू संथ येत होता; म्हणून स्वीप फटवचासाठी प्रसिद्ध असलेल्या डावखुऱ्या ट्रॅव्हिस हेडने शतकी डावात तो फटका पूर्णपणे स्थान केलेला होता. याउलट आपले अनुभवी फलंदाज, स्वीपच्या फटवयाच्या माहेल पडत गेले. धावा वाढल्या नाहीतच पण त्यांनी विकेट फेकल्या अशा वेळी भारतीय संघ व्यवस्थापन, कोच यापैकी कुणीही त्यांना संदेश का पाठविला नाही?

मुळातच फलंदाजीचा क्रम नको तेथे चुकविण्याचा या संघ व्यवस्थापनालाच दोषी ठरवावे लागेल. श्रेयस अय्यरने बंगळूरू व मुंबईच पाटा खेळ्यपट्टीवर वेगवान शतके झळकावली म्हणून त्याला चौथ्या या ठरलेल्या क्रमांकावरच पाठविण्याची गरज नव्हती. श्रेयसचा अनुभव तोकडा आहे. त्याच्या फलंजदाजीत परिपक्वता यायची आहे. अंतिम सामन्याचे दडपण, आणि संथ खेळपट्टीवर पाहता त्याच्याजागी त्याच्यापेक्षा अधिक अनुभवी व परिपक्व के.एल.राहूलला पाठवणे परिस्थितीनुरूप योग्य ठरले असते.

आपण फलंदाजीचे क्रम बदलले पण अनावश्यक ठिकाणी सूर्यकुमार यादवला जर तुम्ही स्फोटक फलंदाज मानता तर त्याला त्याचा नियमित क्रमांक न देता खाली फलंदाजीला का पाठविले. जाडेजा हा झुजार फलंदाज आहे. कोसळता डाव तो सावरतो. पण सूर्यकुमार यादव या फलंदाजीच्या क्रमवारीतील वरच्या क्रमांकावर असणाऱ्याला सातव्या क्रमांकावर पाठविणे ही समयसूचकता निश्चितच नव्हती. उलट मी चालीमुळे खच्ची झाली असेल तो सूर्याकुमार यादव.

के.एल.राहुल आणि कोहली मधल्या षटकांमध्ये फटकेबाजीही करीत नव्हते आणि एकेरी-दुहेरी धावाही वेगात पळत नव्हते. त्याबाबत तात्काळ निरोप पाठवून त्यांना सूचित का करण्यात आले नाही. ही गोष्ट कळण्याची कुवत नसेल आणि सांगण्याची हिम्मत नसेल तर कोच आणि मॅनेजर कशाला हवेत.

भारतीय संघ जिंकत होता, तोपर्यंत त्यांच्या सर्व चुकांकडे दुर्लक्ष करण्यात येत होतं. संघनिवडीबाबत नकारात्मक शब्द उच्चारला जात नव्हता. निवृत्तीकडे झुकलेल्या अश्विनला जर अंतिम ११ जणांमध्ये स्थान द्यायचे नव्हते तर मग १५मध्ये त्याला का घेण्यात आलं? ऑस्ट्रेलियाविरूद्ध मानसिक दबावासाठी त्याच्या ऑफस्थित गोलंदाजीची खर तर गरज होती. परंतु खेळपट्टी काळ्या मातीची पसंत करून भारतीय संघ फसला आणि नाणेफेक हरल्यानंतर आणखी गाळात सतत गेला.

भारतीय संघ जिंकत होता, त्यावेळी नाणेफेकीचे अनुकूल कौल आणि सर्वच गोलंदाज आणि फलंदाजांना एकाच वेळी सूर गवसणे या गोष्टीही निर्णय निश्चित करीत होत्या. सलग १० विजयानंतर अंकशास्त्राच्या गणितानुसार आपल्याला कुठे तरी फटका बसणार होता. दुदैवाने तो अंतिम सामन्यात बसला.

आणखी एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. ते म्हणजे १९८३ च्या विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघांच्या कप्तान कपिलदेव याची त्या संघांतील खेळाडूंना अंतिम सामन्यासाठी निमंत्रित करण्याची विनंती सरळसरळ धुडकावण्यात आली. २०११च्या संघाला निमंत्रित करण्याची तर बातच सोडी.

सचिन तेंडुलकरला बोलविले काम झाले, इतरांची गरज काय? दृष्टीकोन बीसीसीआयचा होता. मात्र पाहुण्यांमध्ये सद्गुरूसारखे निमंत्रित होते आणि क्रिकेटचा खरा सद्गुरू कपिलदेव याला निमंत्रण नव्हते. या दृष्टीकोनामुळे आणि प्रचंड पैसा आल्यामुळे क्रिकेट सतत पराभूत होत आहे. भारतातील बऱ्याच क्रिकेट संघटनांमध्ये प्रशासनातून अधिकाधिक क्रिकेटपटूंना हद्दपार करण्यात येत आहे. योग्यता नसलेले केवळ राजकीय प्रभावामुळे क्रिकेट असोसिएशनमध्ये घुसत आहेत. निवृत्त न्यायमूर्ती लोढा आणि न्यायालयाने किती चांगला हेतून बदल घडवून आणले होते. त्यातील पळवाटांमार्फत राजकीय प्रभाव अधिक झाला आहे. क्रिकेट हे लाभाचे कुरण ठरले आहे.

दुष्टपुरे नष्ट करणारी त्रिपुरारी

दिवाळीच्या मुख्य दिवसांनंतरही काही दिवस हा सण रुंजी घालताना दिसतो. सणाचे मुख्य दिवस सरले तरी तुळशी विवाहाच्या निमित्ताने तोच उत्साह आणि धार्मिकता घराच्या चौकटींवर चिकटून राहताना दिसते. मनातले दिवे अजून लुकलुकतच असतात. त्याचा मंद प्रकाश आनंदाचे कोनाडे उजळवत असतो. अशातच साजरी होते ती त्रिपुरारी पौर्णिमा. ही पौर्णिमा आपला वेगळा दिमाख राखून आहे. त्या निमित्ताने...

स्वाती पेशवे

दीपावलीची ओळखच मुळात दीपांच्या लक्ष रांगोळ्यांमध्ये सामावली आहे. अनेक घरांमध्ये दररोज सांजवात लागत असली आणि शहरांमध्ये दर दिवशीच दिवाळीसारखाच दिव्यांचा झगमगाट बघायला मिळत असला तरी दिवाळीतल्या रोषणाईला लाभलेला मांगल्याचा परिसस्पर्श काही वेगळेच परिणाम देऊन जात असल्याचे कोणीही नाकारणार नाही. महत्त्वाचे म्हणजे दिवाळीच्या मुख्य दिवसांनंतरही काही दिवस हा सण रुंजी घालताना दिसतो. सणाचे मुख्य दिवस सरले तरी तुळशी विवाहाच्या निमित्ताने तोच उत्साह आणि धार्मिकता घराच्या चौकटींवर चिकटून राहताना दिसते. मनातले दिवेही अजून लुकलुकतच असतात. त्याचा मंद प्रकाश दिवाळीतल्या आनंदाचे कोनाडे उजळवतच असतो. अशातच साजरी होते ती त्रिपुरारी पौर्णिमा. दिवाळीच्या मंगलपर्वातील असाच एक महत्त्वपूर्ण आणि झगमगीत दिवस.

आपल्या पोथ्यापुराणांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमेचे महत्त्व विषद करुन सांगितले आहे. समस्त जगताला त्रास देणाऱ्या राक्षसापासून सुटका करुन घेण्यासाठी देवांनी शंकराकडे अर्चना केली तसेच मदतीसाठी शिवाची प्रार्थना केली. त्याला प्रतिसाद देत शंकराने या राक्षसांची तीन पुरे जाळून टाकली तसेच त्यांचा वध केला आणि जनांची छळापासून मुक्तता झाली. हाच दिवस देव दिवाळीचा दिवस म्हणून साजरा केला जातो. त्रिपुरारी पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी केली जाते. ही कार्तिक पौर्णिमा इतर सर्व पौर्णिमांपेक्षा मोठी असते. त्यामुळेही त्रिपुरारी पौर्णिमा मेळ्याला विशेष महत्त्व आहे.

त्रिपुरारी पौर्णिमेला सायंकाळी लोक घरात तसेच घराबाहेरही दीप प्रज्वलित करतात. या दिवशीच्या पूजेला विशेष महत्त्व असते. घराबाहेर देवतांची पूजा केली जाते. त्यानंतर नदीमध्ये दिवे दान करून लोकोत्सव साजरा केला जातो. त्यामुळेच या दिवशी पवित्र नद्यांचे काठ दिव्यांनी उजळलेले दिसतात. अनेक ठिकाणी या दिवशी दीपोत्सव साजरा केला जातो. सार्वजनिक उद्यानांमध्ये, सोसायट्यांच्या प्रांगणांमध्ये दीप लावले जातात. कार्तिकी पौर्णिमा हा एकादशीपासून सुरू होणारा तुळशीच्या लग्नाचा शेवटचा दिवस असतो. याशिवाय कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी बुद्धांचा एक शिष्य, धम्म सेनापती सारीपुत्र याला निर्वाण प्राप्त झाले, असे बौद्ध मत आहे. त्यामुळेच पौर्णिमा मेळ्यात बौद्ध स्त्री-पुरुष उपोषण व्रत करतात. सर्व उपासक आणि भक्त बुद्धाला नमन करण्यासाठी आणि धम्म शिकवण घेण्यासाठी एकत्र जमतात. या अर्थानेही या पौर्णिमेचे महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे.

दिवस एक असला तरी त्याच्याशी संबंधीत कथांमध्ये तसेच साजरीकरणामध्ये मात्र वैविध्य पहायला मिळते. उदाहरणार्थ, उत्तर भारतात पौर्णिमेचा हा दिवस स्कंदजयंती म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने स्कंदमूर्तीची (कार्तिकेयची) पूजा करतात. कार्तिक पौर्णिमेचा चंद्र कृतिका नक्षत्र असताना दिवशी स्कंदाचे म्हणजेच कार्तिकेयाचे दर्शन घेतल्यास भक्तांना मोठे पुण्य प्राप्त होत असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळेच या दिवशी कार्तिक स्वामींच्या मंदिरात विशेष गर्दी पहायला मिळते. भाविक रांगा लावून देवाचे दर्शन घेतात. कार्तिकेय हा शिव आणि पार्वतीचा पुत्र आहे. स्त्रियांनी इतर वेळी कार्तिकेयाचे दर्शन घेऊ नये असा प्रघात आहे. मात्र कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया कार्तिकेयाचे दर्शन घेऊ शकतात. त्यामुळेच या दिवशी या देवतेच्या दर्शनाला महिलांची विशेष गर्दी पहायला मिळते. या दिवशी कृतिका महोत्सवाचे आयोजन केले जाते. त्यामध्ये शिवपूजनाचे विशेष महत्त्व दिसून येते.

याच दिवशी भगवान विष्णूने मत्स्य अवतार घेतला अशी श्रद्धा आहे. त्यामुळेच या दिवशी शिवाबरोबर विष्णुचीही पूजा केली जाते. हा भगवान विष्णूचा पहिला अवतार आहे. मत्स्य पुराणानुसार, प्रलय संपेपर्यंत वेद, सप्तऋषी, धान्य आणि राजा सत्यव्रत यांचे रक्षण करण्यासाठी देवाला हा अवतार घ्यावा लागला. त्यामुळे विश्वाची निर्मिती पुन्हा सोपी झाली. आजही त्याचे स्मरण ठेवले जाते. त्या निमित्ताने विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करुन देवाला आणि नंतर ते प्रसाद म्हणून भाविकांना अर्पण केले जातात. याला अन्नकोट आसन म्हणतात. देशाच्या प्रत्येक भागात त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने मंदिरे आणि सार्वजनिक ठिकाणी दीपोत्सव साजरा केला जातो. मंदिरातील दगडी दीप प्रज्वलित करून सायंकाळी वाती प्रज्वलित केल्या जातात. भगवान शंकरासमोर त्रिपुरी वात अर्पण करून भक्त उत्सव साजरा करतात. त्रिपुरवात नेहमीपेक्षा वेगळ्या प्रकारची असते. तिन्हीसांजेला दिवेलागण झाल्यानंतर ती घरातील देवांसमोर वा मंदिरांमध्ये प्रज्वलित केली जाते. त्रिपुरवात जळण्यास वेळ लागत असल्यामुळे विझेपर्यंत भाविक स्तोत्रपठण वा अन्य धार्मिक कृत्ये करतात. नामजप केला जातो. वात शांत झाल्यानंतर भाविक स्थान सोडतात. या दिवशी मंगल कार्ये केली जातात.

शास्त्रात या पौर्णिमेच्या दिवशी गंगेत स्नान करण्याचे मोठे महत्त्व सांगितले आहे. असे मानले जाते की, ही तिथी सृष्टीच्या सुरुवातीपासूनच अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. पुराणांमध्येही हा दिवस स्नान, उपवास आणि तपस्या या संदर्भात मोक्ष प्रदान करणारा सांगण्यात आला आहे. शिवपुराणानुसार तारकासुराला तारकाक्ष, कमलाक्ष आणि विद्युन्माली असे तीन पुत्र होते. भगवान शिवाचा पुत्र कार्तिकेयाने तारकासुराचा वध केला तेव्हा त्याच्या पुत्रांना खूप वाईट वाटले. त्यामुळे देवांचा सूड घेण्यासाठी त्यांनी कठोर तपश्चर्या करून ब्रह्मदेवांना प्रसन्न केले. ब्रह्माजी प्रकट झाल्यावर त्यांनी अमर होण्याचे वरदान मागितले, परंतु ब्रह्माजींनी त्यांना याशिवाय दुसरे वरदान मागायला सांगितले. तेव्हा तिघेही ब्रह्मदेवाला म्हणाले, तू आमच्यासाठी तीन नगरे बांध. या शहरांमध्ये बसून आकाशातून संपूर्ण पृथ्वीभोवती फिरू आणि हजार वर्षांनी एका ठिकाणी भेटू. आपली तिन्ही नगरे एकत्र होतील तेव्हा एकाच बाणाने त्यांचा नाश करणारा देवच आपल्या मृत्यूचे कारण होईल. ही इच्छा व्यक्त केल्यानंतर ब्रह्माजींनी त्या तिघांना वरदान दिले. भगवान ब्रह्माकडून आपल्याला हवे ते वरदान मिळाल्यामुळे तारकाक्ष, कमलाक्ष आणि विद्युन्माली यांना खूप आनंद झाला. ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून मयदानवांनी त्यांच्यासाठी तीन नगरे बांधली. त्यापैकी एक सोन्याचे, एक चांदीचे आणि एक लोखंडाचे होते. सोन्याची नगरी तारकाक्षची, चांदीची नगरी कमलाक्षची आणि लोखंडाची नगरी विद्यामालीची... आपल्या शौर्याने या तिघांनी या तिन्ही जगावर ताबा मिळवला. मात्र या राक्षसांच्या भीतीने इंद्राबरोबरच सर्व देव भगवान शंकराचा आश्रय घेण्यासाठी गेले. देवतांचे शब्द ऐकून भगवान शिव त्यांच्या मदतीला धावून गेले आणि या त्रिपुरांचा नाश करण्यास सज्ज झाले. देवांच्या आज्ञेनुसार विश्वकर्माने भगवान शिवासाठी एक दिव्य रथ बांधला. त्रिपुरांचा नाश करण्यात देवांनीही अनन्यसाधारण साथ दिली. जसे की, चंद्र आणि सूर्य दिव्य रथाची चाके बनले तर इंद्र, वरुण, यम, कुबेर हे लोकपाल रथाचे घोडे बनले. हिमालय धनुष्य बनला. एवढेच नाही, तर भगवान विष्णू स्वतः बाण बनले आणि अग्निदेव त्याचे टोक बनले. भगवान शिव अशा दिव्य रथावर स्वार होऊन त्रिपुरांचा नाश करण्यासाठी निघाले तेव्हा राक्षसांमध्ये खळबळ उडाली. त्यानंतर दैत्य आणि देवतांमध्ये भयंकर युद्ध झाले. त्रिपुरी सरळ रेषेत येताच भगवान शिवाने दैवी बाण मारून त्यांचा वध केला. भगवान शिवाला त्रिपुरारी असे म्हणण्यामागील कारण त्यांनी या त्रिपुरांचा अंत करण्यामध्ये दडले आहे. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी त्रिपुराची समाप्ती झाल्यामुळेच याला त्रिपुरारी पौर्णिमा म्हटले जाते.

पुराणांमध्ये अशा अनेक कथा वाचायला मिळतात. परंपरेनुसार पुढील पिढीपर्यंत त्या पोहोचवल्या जातात. अर्थातच काळानुसार त्यातील सत्यासत्यतेवर चर्चा होते. समाज त्यापुढे अनेक प्रश्न उपस्थित करतो. त्यावर बरे-वाईट भाष्य केले जाते. या सगळ्यामागे प्रत्येकाचा विचार वा धारणा असते. मात्र क्षणभर हे सगळे मतभेद वा मतमतांतरे बाजूला ठेवून विचार केला तर लक्षात येते की, अशा प्रत्येक कथेमधून समाजाला काही एक शिकवण देण्याचा विचारच बघायला मिळतो. कारण समाज बदलला असला तरी सुष्ट आणि दुष्ट शक्तींमधील संघर्ष काही संपत नसतो. उपद्रव्यमूल्य दाखवून देणारे काही नतद्रष्ट सतत समाजातील स्वास्थ्य धोक्यात आणतच असतात. त्यांच्या त्रासाने व्यथित, भयभीत झालेला एक वर्ग प्रत्येक काळात त्रस्तता अनुभवतच असतो. अशांची मुक्तता करण्यासाठी कोणी तरी पुढे येण्याची आणि दुष्ट शक्तींचे अस्तित्त्व संपवण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची गरज असते. त्रिपुरारी पौर्णिमेचा दिवस हेच सांगून जातो. तमाचा नाश होतो तेव्हा घरे-दारे आणि लोकांची मने उजळून निघतात. देवळे-रावळे गजबजतात. लोकांचा वावर निर्धोक होतो. आजही याच जाणिवेने आणि अपेक्षेने हा दिवस साजरा करायला हवा. दुष्टांना अभय देणारी तीन पुरे जळाली तशी जनांना नाडणारी सगळी दुःखालये जळून तिथे सुखाची वहिवाट वाढो, ही अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करता येते. ■■

प्रसूती आणि डायबिटीस

डॉ. अपूर्वा कुलकर्णी-पाटील या एम.बी.बी.एस, एम.डी. (मेडिसिन) असून त्यांनी हृदयरोग, डायबेटीज, थायरॉईड तसेच कोरोनासहित इतर फुफुसांच्या रोगांच्या ट्रीटमेंटमध्ये प्राविण्य मिळविले आहे. सध्या त्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून रुजू आहेत व या पूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे डायलिसीस इंचार्ज म्हणून काम केले आहे. वाचकांना किडनी आजाराविषयी काही शंका असल्यास एस.टी.स्टॅन्ड जवळ त्यांच्या सोनोमेड क्लिनिक (७२६४९१६३६२)मध्ये त्यांना भेटू शकतात.

गर्भावस्थेतील मधुमेह ही एक मोठी वैद्यकीय समस्या आहे. कारण ती आई आणि गर्भ दोघांनाही धोका निर्माण करू शकते. पूर्वीच्या काळात टाइप १ मधुमेह असलेल्या महिलेसाठी तिची गर्भधारणा पूर्ण करणे जवळजवळ अशक्य होत असे . टाईप २ मधुमेह असलेल्या स्त्रिया गर्भधारणा करत असत

परंतु त्या प्रसूती अतिशय गुंतागुंतीच्या असत. मधुमेहावरील नवीन उपचारपद्धतींच्या विकासासह, गर्भधारणा सुसह्य झाली आहे.

पण त्याचबरोबर बदलत्या जीवनशैलीनुसार तरुणाईमध्ये डायबेटिस चे प्रमाणही वाढत आहे, परिणामतः डायबेटिस असलेल्या गर्भवतींची वाढती संख्या ही चिंताजनक आहे. जर गरोदर होण्याआधी मातेला डायबेटिस असेल तर पाळीची अनियमितता किंवा पॉलीसिस्टिक ओवॅरियन सिन्ड्रोम होऊन गर्भधारणेची शक्यता कमी होऊ शकते .

डायबेटिसला कारणीभूत असणारा 'इन्सुलिन रेसिस्टन्स' प्रसूतीमध्ये अधिक वाढतो. त्यामुळे गरोदरपणात प्रिडायबेटिस चे रूपांतर डायबेटिसमध्ये सहजरित्या होताना निदर्शनास येते .

गर्भवती महिलांमध्ये असणारा मधुमेह पुढील २ प्रकारांमध्ये मोडतो

१. जेस्टेशनल डायबेटिस (गर्भावस्थेत प्रथम निदान झालेला डायबेटिस)

२. प्री जेस्टेशनल डायबेटिस (गर्भधारणेच्या आधी उद्भवलेला डायबेटिस)- हा टाईप १, किंवा टाईप २ असू शकतो.

जेस्टेशनल डायबेटिस हा तुलनेने सौम्य असतो व बहुदा प्रसूतीनंतर राहत नाही. असे असले तरीही जेस्टेशनल डायबेटिस झालेल्या स्त्रियांना भविष्यात टाईप २ डायबेटिसचा धोका अधिक असतो.

संशोधनानुसार, भारतातील शहरी भागात राहणाऱ्या १५ ते २० टक्के गर्भवतींना डायबेटिस डिटेक्ट होतो. ग्रामीण भागात हा आकडा काहीसा कमी असला तरी भारताची लोकसंख्या पाहता तोही अवाढव्य आहे आणि निदानासाठी आवश्यक सुविधांअभावी निदर्शनास न आलेल्या रुग्णांचीही संख्या मोठी आहे.

आई वडील डायबेटिक असल्यास, आधीच्या गरोदरपणात गर्भपात, उच्चरक्तदाब होऊन गेल्यास, स्थूल स्त्रियांमध्ये, जुळे गर्भ असल्यास गरोदरपणात डायबेटिसची शक्यता वाढते.

गर्भावस्थेत डायबेटिस निर्माण करण्यास पोषक असणारे हार्मोन्स चे प्रमाण वाढते (उदा. प्रोलॅक्टिन, कर्टिसॉल, प्लॅसेंटल लॅक्टोजन). सामान्यतः इन्सुलिन ही तितक्याच प्रमाणात वाढत असल्याने शुगर कंट्रोलमध्ये राहते. परंतु इन्सुलिन त्या पटीत न वाढल्यास डायबेटिसची स्थिती निर्माण होते.

गर्भवतीच्या रक्तातील साखर ही सहजरित्या गर्भाच्या रक्तात मिसळत असते, परिणामतः इन्सुलिन निर्माण करण्यासाठी बाळाच्या स्वादुपिंडाचा आकार , जास्त मोठा होतो व बाळामध्ये इन्सुलिनचे प्रमाण वाढते. इन्सुलिन हे एक स्टोरेज हॉर्मोने आहे. इन्सुलिन वाढल्याने बाळाचे वजन व आकारमान अयोग्य प्रमाणात वाढते. अशा बिग बेबीची डिलीवरी करताना बाळाला किंवा मातेला इजा होऊ शकते. डिलिव्हरी नंतर नाळ कापल्यावर अचानक मातेकडून जाणारी शर्करा न मिळाल्याने नवजात बालकाची शुगर कमी होऊ शकते व जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. ह्याबरोबरच डायबेटिस मुळे बाळात रक्ताभिसरण

संस्थेचे, मज्जासंस्थेचे, हाडांचे, आतड्याचे, हृदयाचे व्यंग उद्भवू शकते. मातेची शुगर अनकंट्रोलड असल्यास गर्भपात देखील होऊ शकतो.

सर्व गर्भवतींनी डायबेटिसची चाचणी करावी का ? होय. भारतीय वंश हा डायबेटिज साठी 'हाय रिस्क' असणारा ग्रुप आहे. भारतीय वंशाच्या सर्व स्त्रियांनी प्रत्येक गर्भावस्थेत डायबेटिसची चाचणी केलीच पाहिजे. प्रथम चाचणी प्रसूती चे निदान झाल्याबरोबर लगेच केली जाते. प्रथम चाचणी नॉर्मल आल्यास दुसरी चाचणी २४ ते २८ आठवड्यामध्ये केली जाते.

परंतु अनेकदा भारतीय गर्भवती महिला रुग्णालयात नियमित येत नाहीत म्हणूनच 'डायबेटिस इन प्रेग्नन्सी स्टडी ग्रुप इंडिया' यांनी सोपा पर्याय सुचवला आहे. ह्यात मातेला ७५ ग्राम ग्लुकोज देऊन २ तासांनी एकदाच शुगर मोजली जाते. ती जर १४० मिलिग्रॅम पर डेसिलिटेर किंवा पेक्षा जास्त असेल तर जेस्टेशनल डायबेटिस असे संबोधले जाते.

गरोदरपणातील डायबेटिजला काय उपचार उपलब्ध आहेत ? - आहारात बदल व योग्य व्यायाम हा अतिशय दुर्लक्षित परंतु सर्वात महत्वाचा उपचार आहे. जेवणात किती कार्बोदके व किती प्रथिने असावीत हे आपल्याला डॉक्टरांकडून माहित करून घेणे महत्वाचे आहे.

कॅल्शिअम व फॉलीक ऍसिड, इतर मातांप्रमाणेच डायबेटिक मातांनाही दिले जाते.

आहार व व्यायाम यांनी शुगर कंट्रोल न झाल्यास इन्सुलिन सुरु करावे लागते. इन्सुलिन हा प्रेग्नन्सी मध्ये सर्वात सुरक्षित पर्याय आहे. इन्सुलिन सुरु असलेल्या गर्भवतीला दररोज स्वतः शुगर मोजण्यास व त्याची नोंद ठेवण्यास सांगितले जाते. उपाशीपोटीची शुगर ९० मि लिग्रॅम पेर डेसिलिटर व जेवणानंतरची शुगर १२० मिलिग्रॅम पर डेसिलिटरपेक्षा कमी असावी.

अलीकडच्या काळात मेटफोर्मीन ह्या गोळीचा सुद्धा वापर गर्भवतींमध्ये केला जात आहे.

डिलिव्हरी - डायबेटिक महिलांना शेवटच्या आठवड्यांमध्ये लक्षपूर्वक तपासणी साठी जाणे आवश्यक असते. डिलिव्हरी व्हजायनल किंवा सीझर करावी हे प्रसूतितज्ज्ञ ठरवतात. डिलिव्हरी नंतर फेरतपासणी साठी डायबिटीस तज्ज्ञ व प्रसूती तज्ज्ञ दोघांकडेही जाणे गरजेचे असते. प्रसूतीनंतरही स्थूलपणा कायम राहिल्यास डायबेटीस चा धोका कायम राहतो.

दैनंदिन जीवन सुलभ करण्यासाठी मानवाने उपकरणांची व यंत्रांची निर्मिती केली . त्यामुळे कुठेतरी शारीरिक व्यायाम हा दैनंदिन जीवनातून नाहीसा होत गेला, व जीवन शैलीशी संबंधित असणाऱ्या रोगांच्या विळख्यात आपण अडकत गेलो. डायबिटीस नाहीसा करणे अशक्य असले तरी; योग्य व्यायाम, संतुलित आहार यांची जर सांगड घातली तर नक्कीच आपण डायबिटीसवर मात करू शकतो. ■ ■

उत्तरकाशी येथे चारधाम रस्ता परियोजनेच्या कामादरम्यान झालेल्या अपघातामुळे सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या ४१ श्रमिकांच्या स्थितीचा, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक व्यथांचा अंदाज आपण बांधू शकतो. मात्र बोगद्यात अडकलेल्या लोकांसाठी, त्यांचे शारीरिक आणि मानसिक मनोबल टिकवण्यासाठी केले गेलेले प्रयत्नही वाखाणण्याजोगे ठरले. भर दिवाळीच्या काळात अनुभवायला मिळालेल्या थराराचा हा मागोवा.

दुर्घटनेने काय दाखवले?

अजय तिवारी

होणारा प्रत्येक अपघात परिस्थितीतील त्रुटी दर्शवून जात असतो. अपघाताला कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या चुका कारण ठरत असतात. निसर्गनिर्मित आपत्ती वगळता मानवी चुका, मशिन्समधील बिघाड, तंत्रज्ञानातील कमतरता, संगणकीय गोंधळ या वा अशाच अन्य काही कारणांमुळे परिस्थिती असंतुलित होते आणि अपघात घडतो. काही अपघात आर्थिक नुकसानीबरोबरच पैशात मोजदाद होणार नाही, अशा स्वरुपाचे असतात. ते अनेकांच्या जीवावर उठतात. नाहक बळी घेणारी दुर्घटना संबंधित कुटुंबांबरोबरच बघणाऱ्या प्रत्येकाला हेलावून टाकते. बघता बघता अकाली काळाने हिरावून घेतलेले चेहरे अनेक दिवस झालेल्या चुकांचे गांभीर्य समोर आणत राहतात. म्हणूनच प्रत्येक अपघात घडल्यानंतर तातडीने सेवा पुरवणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच झालेल्या चुका जाणून त्याच्या परिमार्जनासाठी तात्काळ पावले उचलणेही महत्त्वाचे. उत्तराखंडमधील बोगद्याचा विषयही यास अपवाद नाही.

या पार्श्वभूमीवर उत्तरकाशी येथे चारधाम रस्ता परियोजनेच्या कामादरम्यान काही भाग कोसळून झालेल्या अपघातात सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या ४१ श्रमिकांच्या स्थितीचा, त्यांच्या शारीरिक आणि मानसिक व्यथांचा अंदाज आपण बांधू शकतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खाची कल्पनाही आपण करु शकतो. मात्र बोगद्यात अडकलेल्या लोकांसाठी, त्यांचे शारीरिक आणि मानसिक मनोबल टिकवण्यासाठी केले गेलेले प्रयत्नही वाखाणण्याजोगे म्हणावे लागतील. उत्तराखंडम धील सिलक्यारा बोगद्यात अडकून पडलेल्या श्रमिकांच्या सुटकेसाठी योजलेले नानाविध उपाय नोंद घेण्याजोगे आहेत.

आपण एका बंदिस्त जागेमध्ये अडकलो आहोत आणि सुटकेसाठी प्रयत्नांची शर्थ सुरू असतानाही प्रत्यक्षात यातून बाहेर पडू की नाही, ही भावनाच कोणत्याही व्यक्तीचे खच्चीकरण करणारी असते. दुसरीकडे बंदिस्त, कोंडलेल्या, कमी प्राणवायू आणि वायूविजनाची मर्यादित सोय असणाऱ्या जागेमध्ये आरोग्य टिकवून ठेवणेदेखील जिकिरीचे असते. सुदैवाने उत्तराखंडमधील दुर्घटनेत श्रमिक अडकलेल्या बोगद्याभोवती २,२०० मीटर मोकळी जागा होती. त्यामुळे त्यांच्यासाठी पुरेसा ऑक्सिजन उपलब्ध होऊ शकला. परिणामी, त्यांना ऑक्सिजनची कमतरता भासली नाही. मात्र बोगद्यात अडकलेल्या श्रमिकांना पुरेसे अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तू पुरवण्यासाठी तिथे तातडीने ४२ मीटरपर्यंत मोठ्या व्यासाचे पाइप टाकण्यात आले तर दुसरीकडे बोगद्याच्या वरुन रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले. बोगद्यात अडकलेल्या कामगारांना खाण्यासाठी सुका मेवा दिला गेला, खेरीज पचनाला हलके असे खिचडीसारखे पदार्थही तातडीने पुरवण्यात आले. केंद्र सरकारकडून औषधे आणि अन्य खाद्यपदार्थही पोहोचवण्यात आले. कामगार अडकलेल्या ठिकाणी पाईपद्वारे हे सर्व सामान पोहोचवले गेले. त्यामुळे उपासमार टळून अडकलेले श्रमिक तग धरु शकले, असे म्हणता येईल.

या बोगद्याच्या बांधकामामुळे उत्तरकाशी ते यमुनोत्री धाम हा प्रवास २६ किमीने कमी होण्याची अपेक्षा होती. त्यासाठी वेगाने काम सुरू होते. मात्र सिलक्यारा बोगद्याचा काही भाग कोसळला आणि त्यात ४१ श्रमिक अडकले. घटना घडल्यानंतरचा काही काळ तणावाचा होता. अपघातात प्राणहानी झाली आहे काय आणि झाली असेल तर ती नेमकी किती, याचीही स्पष्ट कल्पना नव्हती. मात्र परिस्थितीवर ताबा मिळवत वर उल्लेख केल्याप्रमाणे बचावकार्याला निश्चित दिशा मिळाली. पंतप्रधान कार्यालय ऑपरेशनवर देखरेख करत असल्यामुळे कामाने वेग घेतला. साधारणत: दहा दिवसांनंतर तीस सेकंदांचा एक व्हिडिओ प्रसारित करण्यात आला. त्याम ध्ये अडकलेले सुमारे डझनभर श्रमिक कॅमेऱ्यासमोर हेल्मेट आणि बांधकाम कामगारांची जाकीट घालून बोगद्यातील दिव्यांच्या पार्श्वभूमीवर उभे असल्याचे दिसून आले. बाहेर एक बचाव कार्यकर्ता त्यांना एक-एक करून कॅमेऱ्यासमोर हजर होण्यास सांगण्याचा, वॉकी-टॉकी गियरवरुन त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत होता. याद्वारे आत नेमके कितीजण अडकले आहेत हे समजणे तसेच त्यांची ओळख समजणे सोपे झाले.

हा व्हिडिओ मेडिकल एंडोस्कोपी कॅमेऱ्याद्वारे शूट करण्यात आला होता. सहा इंच (१५ सेमी) व्यासाच्या दुसऱ्या विस्तीर्ण पाइपलाइनमधून तो बोगद्यात ढकलला गेला होता. त्यासाठी ड्रिल करण्यात आले होते. अशा प्रकारे कॅमेऱ्याद्वारे का होईना, अडकलेल्यांपर्यंत पोहोचणे शक्य झाल्यामुळे काम हलके होण्यास मदत झाली, असे म्हणावे लागेल. अडकलेले लोक सुस्थितीत असल्याचे या क्लिपम ध्ये दिसले. विचारल्या गेलेल्या आरोग्याबद्दलच्या प्रश्नांना उत्तर देताना सर्वांनी आपण ठिक असल्याचे सांगितले आणि मदत करणाऱ्या पथकाचा हुरुप वाढला. दुसरीकडे, प्रत्येक कामगाराच्या कुटुंबातील सदस्यांशी संबंधित अधिकाऱ्यांनी संवाद साधला आणि बोगद्याच्या ढिगाऱ्यात अडकलेला त्यांच्या कुटुंबातील सदस्य उत्तम अवस्थेत असल्याची माहिती दिली. त्यामुळेही तणाव कमी होण्यास आणि सकारात्मक प्रतिसाद मिळण्यास मदत झाली.

या संपूर्ण बचाव मोहिमेत भारतीय तज्ज्ञांना मार्गदर्शन करण्यासाठी साइटवर परदेशी तज्ज्ञही उपस्थित होते. खेरीज विशेष कर्तव्य अधिकारीदेखील उपस्थित होते. मुख्य म्हणजे आत अडकलेल्या श्रमिकांचे मानसिक धैर्य टिकवून ठेवण्यासाठी समुपदेशक बाहेरुन सतत त्यांच्याशी संवाद साधत होते. कारण शरीराने साथ दिली तरी अडचणीत सापडलेला माणूस मानसिकदृष्ट्या खचून जाऊ शकतो. मृत्यूची, आप्तस्वकियांच्या भविष्याची, आपल्या सुटकेची भीती त्याला सतावू शकते. हे विचार त्यांच्या शारीरिक अवस्थेवर परिणाम करु शकतात. याची दखल घेत मानसोपचारतज्ज्ञ सातत्याने त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेत होते. त्यांचे मनोधैर्य न ढासळण्याची काळजी घेत होते.

राज्य सरकारने साइटवर पाठवलेले मनोचिकित्सक अभिषेक शर्मा म्हणाले की त्यांनी अडकलेल्या सर्वांना दररोज दोन किमी म्हणजेच १.२ मैल चालण्यास सांगितले होते. खेरीज हलका योग, व्यायाम करण्याचा आणि नियमि तपणे आपापसात बोलण्याचा सल्लाही दिला होता. संकटात अडकलेल्या माणसांसाठी झोप खूप महत्त्वाची असते. मानसोपचार तज्ज्ञांनी अडकलेल्या श्रमिकांना त्यासाठीही मदत केली. त्यामुळेच संकटजन्य स्थिती असूनही ते सर्वजण चांगले झोपू शकले. त्यांना झोप लागण्यात कोणतीही अडचण आली नाही. याशिवाय संबंधित स्थळी डॉक्टरही उपस्थित होते. या तज्ज्ञांनीही अडकलेल्या लोकांना यथोचित सल्ला दिला. खूप हालचाल केल्यास श्वास सोडताना मर्यादित जागेत कार्बन डायऑक्साइड वायू जमा होण्यास चालना मिळू शकते, ही बाब अडकलेल्या लोकांना सांगण्यात आली. त्यामुळेच ४१ जणांनी आत चालण्याचा व्यायाम करुनही फार वेगाने न चालल्यामुळे कोणतीही समस्या उद्भवली नाही. ही बाबदेखील सहाय्यभूत ठरली असे म्हणता येईल.

अशा दुर्घटनांप्रसंगी बचावकार्याला दिशा मिळत असली तरी त्यातही काही अडचणी येत असतात. त्यात उत्तराखंडचा हा प्रदेश भूस्खलन, भूकंप आणि पुराचा धोका असणारा आहे. सहाजिकच यायोगे पुढे येणारे काही धोके या बचावकार्यातही जाणवले. मशिनमध्ये बिघाड झाल्याने आणि नव्याने भूस्खलन होऊन ढिगारा कोसळण्याच्या भीतीने काही काळ ड्रिलिंग थांबवावे लागले. तसेच डोंगरमाथ्यावरून उभ्या ड्रिलिंगसह कामगारांना बाहेर काढण्यासाठी अधिकारी एकाच वेळी पाच इतर योजनांवर काम करत असल्याचे आपण पाहिले. म्हणजेच ही मोहीम एकाच नव्हे तर अनेक पातळ्यांवर आणि अनेक पर्यायांचा अवलंब करणारी होती. त्यामुळे भविष्यात हा अनुभव आणि नैसर्गिक आव्हानांमुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीची माहिती समोर ठेवून काम करणे गरजेचे ठरेल. ■ ■

जिनपिंग-बायडेन भेट आणि भारत

डॉ. विजयकुमार पोटे

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यामध्ये अलिकडेच झालेल्या महत्वपुर्ण बैठकीत अनेक मुद्द्यांवर एकमत झाले तर अनेक बाबींवर सकारात्मक चर्चेचे आश्वासन देण्यात आले. अमेरिका आणि चीन यांनी एकमेकांशी उच्चस्तरीय लष्करी संपर्क पुनर्संचयित करण्याचे मान्य केले आहे. तथापि, तैवान आणि हाँगकाँगसह अनेक मुद्द्यांवर दोन्ही राष्ट्रप्रमुख एकमेकांशी असहमत असल्याचे दिसून आले.

अमेरिका आणि चीनमध्ये गेल्या काही वर्षांपासून तणाव आहे. सुमारे वर्षभरानंतर अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग एका मंचावर आले, तेव्हा साऱ्या जगाच्या नजरा खिळल्या होत्या. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. यापैकी अनेकांबाबत एकमत झाले तर अनेक बाबींवर सकारात्मक चर्चे चे आश्वासन देण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिका आणि चीन यांनी एकमेकांशी उच्चस्तरीय लष्करी संपर्क पुनर्संचयित करण्याचे मान्य केले आहे. यावेळी बोलताना बायडेन म्हणाले की कधी कधी गैरसमज होतात. म्हणून आम्ही थेट, मुक्त आणि स्पष्ट संवादाकडे परतलो आहोत. तथापि, तैवान आणि हाँगकाँगसह अनेक मुद्द्यांवर दोन्ही राष्ट्रप्रमुख एकमेकांशी असहमत असल्याचे दिसून आले. बायडेन यांनी जिनपिंग यांना हुकूमशहा म्हटल्यावर तर हद्द झाली. उभय देशांमधील चर्चेत दोन्ही देशांचे नेते एकमेकांशी वाटेल तेव्हा फोनवर बोलतील, संवादाचे मार्ग खुले राहतील यावर एकमत झाले. बायडेन आणि जिनपिंग यांनी अमेरिकेतील ड्रग ओव्हरडोसचे प्रमुख कारण असलेल्या फेंटॅनीलचा पुरवठा रोखण्यासाठी सहकार्य करण्यावर एक करार केला. संभाषणात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वरही चर्चा झाली. व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की दोन्ही देशांच्या नेत्यांनी प्रगत 'एआय' प्रणालींच्या जोखमींना तोंड देण्यासाठी अमेरिका आणि चीन सरकारमध्ये सुरक्षा व्यवस्था विकसित करण्याबाबत सहमती दर्शवली.

अर्थात या बैठकीत सर्व काही सुरळीत झाले नाही. बायडेन यांनी तिबेट, शिनजियांग, हाँगकाँगमधील मानवाधिकारांच्या उल्लंघनाचा मुद्दा उपस्थित केला, तेव्हा जिनपिंग त्यांच्याशी सहमत झाले नाहीत. तैवानचा मुद्दा पुढे आला, तेव्हा जिनपिंग यांनी अमेरिकेने तैवानला शस्त्रे देणे बंद करावे, असे स्पष्ट शब्दांमध्ये सुनावले. बायडेन यांनी जिनपिंग यांना 'हिटलर' म्हटल्यामुळे अमेरिका आणि चीनमध्ये सर्व काही ठीक नाही, हे स्पष्ट झाले. बैठकीनंतर बायडेन यांना विचारले गेले की ते अद्याप जिनपिंग यांना हुकूमशहा मानतात का? यावर बायडेन म्हणाले की होय, ते हुकूमशहा आहेत. कम्युनिस्ट असलेल्या देशात जिनपिंग हे सरकार चालवत आहेत, या अर्थाने ते हुकूमशहा आहेत. आपल्या सरकारचे आणि चीनचे स्वरूप खूप वेगळे आहे. बायडेन यांच्या या विधानावर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मात्र आक्षेप घेतला.

बायडेन आणि जिनपिंग यांच्यात नुकत्याच झालेल्या भेटीमुळे जागतिक समीकरणे बदलल्याचे दिसून आले. दोन जागतिक महासत्तांच्या प्रमुखांमधली ही बैठक केवळ द्विपक्षीय बाब नसून विशेषत: चीनसोबत दीर्घकाळ चाललेल्या सीमावादामुळे भारतावरही याचा परिणाम होऊ शकतो. बायडेन आणि जिनपिंग यांच्यामध्ये नुकत्याच झालेल्या चर्चेकडे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये बदल होण्याच्या दृष्टीने एक मोठे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. या चर्चे चा केंद्रबिंदू हवामान बदलासारख्या जागतिक आव्हानांवर होता; परंतु दोन्ही देशांनी इतर अनेक आव्हानांवरही सहकार्य करण्याची इच्छा दर्शवली. या नवीन घडामोडींकडे दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्याच्या आणि सामूहिक प्रयत्न वाढवण्याच्या नव्या युगाची सुरुवात म्हणून पाहिले जाऊ शकते. चीनसाठी मोठा राजनैतिक फायदा म्हणून या बैठकीकडे पाहिले जात आहे. दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्यासाठी आणि आर्थिक विकास दर वाढवण्यासाठी परदेशी गुंतवणूक वाढवण्याचे चीनचे उद्दिष्ट आहे. या बैठकीचा चीनला राजनैतिकदृष्ट्या फायदा झाला आहे. आर्थिक विकास वाढवण्यासाठी आणि परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी चीनला अमेरिकेसोबतचा तणाव कमी करायचा होता. अशा परिस्थितीत अमेरिका आणि चीन यांच्यातील लष्करी चर्चा पुन्हा सुरू होणे हा विजय मानला जाऊ शकतो.

गेल्या वर्षी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या अध्यक्षा नॅन्सी पेलोसी यांच्या तैवान दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील लष्करी चर्चा विस्कळीत झाली होती. जागतिक स्तरावर होत असलेल्या या बदलांमध्ये भारताची स्थिती अत्यंत गुंतागुंतीची बनली आहे. अमेरिका आणि चीनमधील संबंधांमधील बदलत्या समीकरणांमुळे भारताच्या चीनकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर परिणाम होऊ शकतो. अमेरिका-चीन संबंधांबाबत भारताची भूमि का बहुआयामी आहे. आशिया आणि इंडो पॅसिफिक क्षेत्राच्या बदलत्या समीकरणांमुळे भारत आणि अमेरिकेला आपले संबंध नव्या उंचीवर नेण्याचा विचार करावा लागणार आहे. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील प्रादेशिक वर्चस्वाच्या चीनच्या दाव्याला आव्हान देणे आणि या प्रदेशातील वाढता प्रभाव कमी करणे याला आपले प्राधान्य असल्याचे अमेरिकेने वारंवार सांगितले आहे. चीनबाबत आक्रमक भूमिका घेण्यापासून उच्चस्तरीय लष्करी चर्चा पुन्हा सुरू करण्यापर्यंतच्या अमेरिकेच्या भूमिकेतील हा बदल चीनशी सामना करण्याच्या रणनीतीतील बदल दर्शवतो. 'आशिया पॉलिसी सोसायटी इन्स्टिट्यूट'चे सीनियर फेलो सी. राज मोहन यांनी अशा परिस्थितीत भारताचे धोरण काय असू शकते या विषयावर बोलताना सांगितले की भारताची स्वतःची धोरणे आहेत. तो अमेरिका, चीन आणि रशियाशी आपले संबंध जुळवत आहे. अमेरिकेसोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी नवीन शक्यतांचा फायदा घेण्यावर भारताचा भर असायला हवा.

आजघडीला अमेरिका भारताच्या जागतिक उदयाला पाठिंबा देत आहे. या पार्श्वभूमीवर जिनपिंग-बायडेन यांच्या भेटीमुळे तैवान-चीन यांच्यातील तणाव कमी झाला तर ते भारताच्या फायद्याचे असणार आहे. त्याचे कारण भारत आणि चीनच्या मध्ये तैवान आहे. तैवानमधील अनेक कंपन्यांचे भारताशी चांगले संबंध आहेत. चीनला शह देण्यासाठी तैवानच्या कंपन्यांनी भारताशी करार केले आहेत. सेमीकंडक्टरसह अन्य उत्पादने आता भारतात होऊ घातली आहेत. चीन आणि अमेरिकेतील संबंध सुधारण्यामुळे एकीकडे शांतता नांदण्याची शक्यता असली, तरी दुसरीकडे भारताला दक्षिण आशियात मदत का करायची, असा प्रश्न अमेरिकेला पडू शकतो. तसेच तैवान आणि चीनमधील संबंधातील कटुता संपली, तर भारतात गुंतवणूक आणि सामंजस्य करार करण्यातील तैवानच्या कंपन्यांचा रस कमी होईल; मात्र तैवानमध्ये पुढील वर्षी होऊ घातलेल्या निवडणुकीच्या निमित्ताने अमेरिकेने व्यक्त केलेली अपेक्षा पाहिल्यास तैवान-चीन संबंध लगेच सुधारतील असे नाही. चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांनी आपण कोणत्याही देशावर आक्रमण केले नाही, असे सांगितले असले तरी त्यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. त्याचे कारण तैवानभोवती चीनी लष्कराच्या सुरु असलेल्या हालचाली, दक्षिण चीनी समुद्रात व्हिएतनाम-जपानविरुद्ध सुरू असलेल्या कारवाया आणि भारतातील गलवान खोऱ्यात तसेच डोकलाममध्ये झालेल्या चकमकी विसरता येणार नाहीत.

हिंदी महासागर-पॅसिफिक महासागर क्षेत्रात भारताने अधिक ठाम भूमिका बजवावी, अशी अमेरिकेची अपेक्षा वाढली आहे. नैसर्गिक आपत्तींच्या वेळी मानवतावादी आधारावर केलेल्या मदतकार्याच्या पलीकडे भारत काही तरी करेल, अशी अमेरिकेला आशा आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेश सर्वांसाठी खुला ठेवण्यासाठी आणि गरज पडल्यास थेट चीनला आव्हान देण्यासाठी अमेरिका आणि तिच्या मित्रदेशांना भारताची गरज लागणार आहेच. त्यामुळे दोन नेत्यांचे द्वीपक्षीय संबंध सुधारण्यासाठी भेटी झाल्या तरी लगेच भारताने चिंता करावी असे नाही; परंतु याचा अर्थ दुर्लक्ष करावे असाही नाही. भारताला चीनसोबतच्या लष्करी संघर्षात अडकायचे नाही आणि त्याच वेळी अमेरिका आणि चीन यांच्यात सहमती होऊ शकणाऱ्या नवीन प्रादेशिक व्यवस्थेपासून भारत दूर राहू इच्छित नाही. अमेरिकेने तैवानचा मुद्दा उपस्थित करू नये, असे चीनचे स्पष्ट मत आहे. ■ ■



क्षणिक

राशिद लवकरच परतणार

ॲडलेड : अफगाणिस्तानचा फिरकीपटू राशिद खानच्या पाठीवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. राशिदने हा छायाचित्र सोशल मीडियावर शेअर केला आहे. राशिदचे हे छायाचित्र रुग्णालयातील आहे.छायाचित्रासोबत त्याने लिहिले की, 'तुमच्या सर्व प्रार्थनांसाठी खूप खूप धन्यवाद. शस्त्रक्रिया चांगली झाली आणि मी आता बरे होण्याच्या मार्गावर आहे. मी मैदानात परतण्यासाठी उत्सुक आहे. राशिदने माघार घेतल्याची माहिती ॲडलेड स्ट्रायकर्सने २३ नोव्हेंबर रोजी ट्विटरद्वारे दिली होती.

पुरूषोत्तम सावंत यांचे निधन

कल्याण : ज्येष्ठ मल्लखांबपटू आणि युरोपात मल्लखांब व्यायाम प्रकाराची ओळख करून देणारे पुरूषोत्तम उर्फ बजरंग सावंत यांचे बुधवारी येथे हदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ते ९१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,मुलगी आणि नातवंडे असा परिवार आहे. कल्याण मधील नमस्कार मंडळाचे पुरूषोत्तम सावंत माजी अध्यक्ष होते. अध्यक्ष असताना पॉवर लिफ्टिंग, वेट लिफ्टिंग, शरीरसौष्ठव, सूर्यनमस्कार हे प्रकार जनमानसात रूजविण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

ऑस्कर पिस्टोरिअस सुटणार

नवी दिल्ली : दक्षिण अफ्रिकेचा प्रसिद्ध माजी पॅरालिम्पिक खेळाडू ऑस्कर पिस्टोरियसला २०१४ मध्ये प्रेयसी रीवा स्टीनकॅम्पची हत्या केल्याप्रकरणी शिक्षा झाली होती. हा खेळाडू आता जेलमधून सुटणार आहे. ५ जानेवारी २०२४ पासून त्याला परोल मंजूर झाला आहे. सुरूवातीच्या काळात ऑस्कर पिस्टोरियसला सहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली होती. मात्र अनेकवेळा त्याचा खटला पुन्हा तपासल्यानंतर त्याची शिक्षा वाढवून १३ वर्षे करण्यात आली.

पांड्या मुंबईतून खेळणार?

मुंबई : आयपीएलची तयारी सुरू झाली आहे. सर्व आयपीएलमधील संघ मालक त्यांच्या गरजेनुसार खेळाडूंची निवड करत आहेत. दरम्यान, हार्दिक पांड्या, ज्याने त्याच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्सला विजेतेपद मिळवून दिले. आता तो मुंबई इंडियन्समध्ये परत येण्याची शक्यता आहे. परंतु १५ कोटींच्या खेळाडूसाठी सध्या मुंबई इंडियन्सच्या खिशात कमी निधी शिल्लक आहे. अशा स्थितीत १५ कोटी रुपये जमवायचे असतील तर मुंबई इंडियन्सला दोन बड्या खेळाडूंना सोडावे लागेल.

वासिमची निवृत्तीची घोषणा

लाहोर : विश्वचषक संपल्यानंतर पाकिस्तानच्या सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू इमाद वसीमने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. वयाच्या ३४ व्या वर्षी त्यांनी निवृत्ती जाहीर केली. इमाद वसीमने त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवरून निवृत्तीची घोषणा केली. त्यांनी एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, मी बऱ्याच दिवसांपासून निवृत्तीचा विचार करत होतो. आता निवृत्तीची योग्य वेळ आहे. इमादने एप्रिल महिन्यात पाकिस्तानसाठी शेवटचा सामना न्यूझीलंडविरुद्ध खेळला होता.

फुटबॉलमध्ये भारताला महाशक्ती बनवण्याची संधी



माजी फुटबॉलपटू ऑलिव्हर कान्ह यांचे मत

। मुंबई । वृत्तसंस्था ।

फुटबॉल या खेळात भारतीयांमध्ये प्रचंड क्षमता आहे. इथल्या लोकांमध्ये फुटबॉलप्रती जी आवड आहे, ती अतुलनीय आहे. आता भारताने फुटबॉल या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची वेळ आली आहे. भारताने या सुंदर खेळाशी आपली समृद्ध संस्कृती एकरुप करावी. मला प्रामाणिकपणे असं वाटतं की जागतिक स्तरावरील फुटबॉल या खेळात भारत लवकरच आपलं स्थान निश्चित करेल आणि विश्वचषकामध्ये स्पर्धेत सहभागी होईल, असे प्रतिपादन ऑलिव्हर कान्ह यांनी केले.

द जर्मन वॉल म्हणून ओळखला जाणारा जर्मनीचा दिग्गज फुटबॉलपटू गोलकीपर ऑलिवर कान्ह मुंबईत आले होते. ऑलिव्हर यांनी मुंबईमधील जी डी सोमाणी इंटरनॅशनल शाळेला भेट दिली. जर्मनीच्या दिग्गज खेळाडूचं शाळेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय पद्धतीने वाजत गाजत स्वागत केलं.

ऑलिव्हर तब्बल १५ वर्षांनी भारतामध्ये आल्याने भारतीय फुटबॉलसाठी मोठी गोष्ट आहे. यावेळी ऑलिव्हर यांनी विद्यार्थांशी संवाद साधताना फुटबॉलबाबत मार्गदर्शन केलं. जी डी सोमाणी इंटरनॅशनल या शाळेला भेट देणं हा अत्यंत विलक्षण अनुभव होता. मला कोलकातामधील माझ्या शेवटच्या सामन्याची आठवण आली. तिथल्या लोकांची आणि चाहत्यांची आठवण आली. माझ्यासाठी ते निराशाजनक होतं. कारण तो माझा शेवटचा सामना होता, दोन दशकं आणि इतक्या साऱ्या आठवणी. मला माझं तारुण्य आठवल्याचं कान्ह यांनी सांगितलं. फुटबॉल हा फक्त खेळ नाही, तो जगण्याचा एक मार्ग आहे. माझ्या करिअरमध्ये जी आव्हानं समोर आली, त्यामुळे मी चिकाटीचं महत्त्व काय असतं हे शिकलो. कधीही हार मानू का, हे माझ्या आयुष्याचं ध्येय आहे आणि मी प्रत्येकाला ते स्वीकारण्यास सांगतो. जे सतत उत्कृष्ट काम करण्याच्या प्रयत्नात असतात, त्यांनाच यश प्राप्त होतं, असंही कान्ह म्हणाले.

एकही चेंडू न खेळता इंडोनेशिया विजयी

पंचांच्या निर्णयाविरोधात कंबोडियाच्या खेळाडूंनी मैदान सोडले

। इंडोनेशिया । वृत्तसंस्था ।

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रत्येक सामान्यात आपल्याला वेगवेगळे विक्रम पाहायला मिळतात. पण तुम्ही कधी असा सामना पाहिला आहे का ज्यामध्ये एक डावही पूर्ण झाला नाही आणि सामन्याचा निर्णय लागला देखील. इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यात झालेल्या एका सामन्यात असाच काहीसा प्रकार समोर आला आहे. या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी केलेल्या कंबोडियाला एकही चेंडू न टाकता पराभव पत्करावा लागला आहे.

इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यात क्रिकेट सामना झाला. या सामन्यात कंबोडिया प्रथम फलंदाजी करत होता आणि १२ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर अशी घटना घडली की सामना तिथेच संपला. इंडोनेशियाचा गोलंदाज धनेश शेट्टी १२ वे षटक टाकत होता आणि तिसऱ्या चेंडूवर त्याने कंबोडियाचा फलंदाज लुकमान बटला पंचांकडे बाद असल्याची दाद मागितली आणि पंचांनी त्याला बाद घोषित केले. नॉन स्ट्राईकवर उपस्थित असलेल्या लुकमान बट आणि फलंदाजाला पंचाचा हा निर्णय आवडला नाही आणि त्यांनी याचा विरोध केला. पंचांनी आपल्या निर्णयावर ठाम राहीन असे सांगताच कंबोडियाचे दोन्ही फलंदाज सामना सोडून मैदानाबाहेर गेले. यानंतर कंबोडिया संघाने पुढे सामना खेळण्यास नकार दिला.

कंबोडियाने सामना खेळण्यास नकार दिल्यानंतर सामना अधिकाऱ्यांनी इंडोनेशियाला सामन्याचा विजेता घोषित केले आणि अशा प्रकारे इंडोनेशियन संघ सामना न खेळता सामना जिंकला. या विजयासह इंडोनेशियाने मालिका ४-२ ने जिंकली. या टी २० मालिकेतील पहिला सामना बाली येथे खेळला गेला, ज्यामध्ये इंडोनेशियाने ७ गड्यांनी विजय मिळवला. त्यानंतर दुसऱ्या सामन्यातही इंडोनेशिया ८ गडी राखून जिंकला.

तिसऱ्या सामन्यात कंबोडियाने दमदार पुनरागमन करत यजमान इंडोनेशियाचा ८ गडी राखून पराभव केला. चौथ्या सामन्यात इंडोनेशियाने कंबोडियाचा १०४ धावांनी पराभव करत मालिकेतील चौथा विजय नोंदवला. या मालिकेतील पाचवा सामना कंबोडियाने ७ गड्यांनी जिंकला आणि मालिका ३-२ अशी बरोबरीत आली. मात्र अखेरच्या टी-२० सामन्यात इंडोनेशियाने फलंदाजी न करता विजय मिळवत मालिका ४-२ अशी जिंकली.

पिंपरीत मेजर ध्यानचंद हॉकी मैदानाचे काम प्रगतीपथावर

। पिंपरी । वृत्तसंस्था ।

नेहरूनगर येथे उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडिअमचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम डिसेंबरअखेर पूर्ण होणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली.

स्थापत्य क्रीडा विभागाच्या सुरू असलेल्या कामांच्या स्थळांची पाहणी खोराटे यांनी केली. तसेच, इतर कामांची माहिती घेऊन उर्वरित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. भोसरी, इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडांगणामधील लॉन टेनिसच्या पूर्ण झालेल्या कामाची माहिती घेतली. लवकरात लवकर काम पूर्ण करावे, असा आदेश त्यांनी दिला.

भोसरी येथील क्रीडा संकुलामधील कामाची पाहणी खोराटे यांनी केली. पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण करून विविध खेळण्यांसाठी मैदान उपलब्ध करून द्यावे. तसेच, कुस्ती प्रशिक्षण केंद्रामध्ये ठिकठिकाणी तैलचित्र लावावे, या सूचना त्यांनी दिल्या. बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान आणि प्राणिसंग्रहालयासही त्यांनी भेट दिली.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

पीएनपीच्या सानिका गोळेची निवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्यस्तर शालेय कबड्डी निवड चाचणी मुलींच्या स्पर्धा पालघर येथे (१७ वर्ष वयोगट) नुकत्याच पार पडल्या. राज्यस्तर शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांच्या मार्फत २८ ते ३० नोव्हेंबर रोजी केले जाणार आहे. सदर स्पर्धेच्या १७ वर्षाआतील मुलींच्या विभागीय स्पर्धेतून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेत सानिका गोळे पात्र ठरली. पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वीची विद्यार्थिनी सानिका संदीप गोळे हिची संघात निवड करण्यात आलेली आहे. या राज्यस्तरीय निवड चाचणी मधून राष्ट्रीय स्पर्धे साठी अंतिम संघ निवडला जाणार आहे. सर्वच प्रकारच्या क्रीडा स्पर्धेत पीएनपी संस्थेचा कायम दबदबा राहिला आहे. अनेक राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय खेळाडू पीएनपीने घडवले आहेत.

सानिका गोळेची निवड झाल्यामुळे पीएनपीच्या शाळेमध्ये आणि संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे. सानिका गोळे हिची निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, खजिनदार नृपाल पाटील, शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, क्रीडा प्रशिक्षक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महिला प्रीमियर लीगच्या लिलावाची तारीख ठरली

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महिला प्रीमियर लीगच्या दुसऱ्या हंगामाचा लिलाव ९ डिसेंबरला मुंबईत होणार आहे. महिला प्रीमियर लीगच्या दुसऱ्याच हंगामाच्या लिलावात संघ मालकांकडे १३.५ कोटींची वाढ करण्यात आली आहे. यंदाची महिला प्रीमियर लीग फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता आहे.

लिलावात गुजरात जायंट्सकडे सर्वाधिक पैसे असणार आहेत. त्यांना अजून १० खेळाडूंची जागा भरायची आहे. त्यानंतर गेल्या हंगामातील उपविजेता युपी वॉरियरकडे ४ कोटी रूपये शिल्लक आहेत.स्मृती मानधनाच्या रॉयल चॅलेंजर बेंगलोरकडे ३.३५ कोटी रूपये शिल्लक आहेत. गतविजेत्या मुंबईकडे २.१ कोटी तर दिल्ली कॅपिट्सकडे २.२५ कोटी रूपये शिल्लक आहेत. मुंबईला ५ तर दिल्लीला ३ जागा भरायच्या आहेत. आरसीबी ३ विदेशी तर मुंबई आणि दिल्ली यांच्याकडे प्रत्येकी १ एका विदेशी खेळाडूचा स्लॉट शिल्लक आहे.

अखिल भारतीय मानांकन टॅलेंट टेनिस स्पर्धा

वैष्णव रानवडेचा सनसनाटी विजय

। पुणे । वृत्तसंस्था ।

एम टेनिस अकादमी व शेपींग चॅम्पियन्स यांच्या संलग्नतेने आयोजित व एआयटीए, एम एसएलटीए, पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए नवसह्याद्री क्रीडा संकूल अखिल भारतीय मानांकन टॅलेंट सिरीज टेनिस स्पर्धेत मुख्य सोडतीमध्ये दुसऱ्या फेरीत मुलांच्या गटात लकी लुझर ठरलेल्या वैष्णव रानवडेने तिसऱ्या मानांकित सनत कडलेचा ७-६(७), ६-२ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. नवसह्याद्री क्रीडा संकूल टेनिस कोर्ट येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात अव्वल मानांकित स्मित उंडरेने आश्रित मज्जीचे आव्हान ६-०, ६-४ असे संपुष्टात आणले. सहाव्या मानांकित नमिश हुडने अंशुल पुजारीवर ६-२, ६-१ असा विजय मिळवला. चौथ्या मानांकित स्वर्णिम येवलेकरने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या अनिश वडनेरकरचा ७-६(६), ६-४ असा पराभव करून उप-उपांत्यपूर्व फेरी गाठली. पाचव्या मानांकित त्रिशिक वाकलकरने आरुष पोतदारला ६-४, ७-५ असे पराभूत केले. मुलींच्या गटात अव्वल मानांकित श्रावी देवरेने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत अयाती तुडयेकरचा ६-०, ६-० असा पराभव केला. सहाव्या मानांकित प्रार्थना खेडकरने आयुश्री तरंगेचा ६-२, ६-४ असा तर, तिसऱ्या मानांकित काव्या देशमुखने सारा फेंगसेचा ६-२, ६-३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

सात्विकसाईराज आणि चिराग शेट्टीची विजयी घौडदौड

चायना मास्टर्सच्या उपांत्यफेरीत प्रवेश

। शिनझेन। वृत्तसंस्था ।

आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेते सात्विक साईराज आणि चिराग शेट्टी यांनी चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य फेरी गाठली. उपांत्यपूर्व सामन्यात त्यांनी इंडोनेशियाच्या लिओ रॉली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन यांचा सरळ गेममध्ये पराभव केला.

अव्वल मानांकित भारताच्या जोडीने हा सामना २१-१६, २१-१४ असा अवघ्या ४६ मिनिटांत जिंकला. या वर्षात सात्विक आणि चिराग यांनी इंडोनेशिया सुपर १००० या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसह कोरिया सुपर ५०० आणि स्वीस सुपर ३०० या स्पर्धांत विजेतेपद मिळवलेले आहे. आता उपांत्य सामन्यात त्यांचा सामना चीनच्या हे जी थिंग आणि रेन झियांग यू विरुद्ध लीऊ यू चेन आणि ओऊ झुयान यी यांच्यातील विजेत्या जोडीशी होईल.

चिराग आणि सात्विक यांनी आजच्या सामन्यात कमालीचे सांमजस्य तर दाखवले पण त्याचबरोबर ते एकमेकांच्या जागाही सातत्याने बदलत होते. सर्व्हिस करण्याची दिशाही बदलती ठेवली होती. त्यामुळे प्रतिस्पर्ध्यांसमोर संभ्रम निर्माण होत होता.

वास्तविक सामन्याची सुरुवात समान पातळीवर झाली होती. पण भारतीयांनी वर्चस्व मिळवण्यास सुरुवात केली तरी पहिल्या गेममध्ये १४-१४ अशी बरोबरी होती. चिरागने काही अप्रतिम फटके मारल्यामुळे १९-१६ अशी आघाडी मिळाली आणि पहिला गेम सहज जिंकला.

पहिल्या गेममधील लय दुसऱ्या गेमम ध्येही कायम राखत भारतीयांनी ५-२ अशी आघाडी घेतली. त्यानंतर काही फटके नेटमध्ये गेले असले तरी भारतीयांकडे ७-५ आघाडी कायम राहिली होती. स्वात्विकने मारलेले काही स्मॅश जोरकस होते त्याचा फायदा ११-६ अशी आघाडी भक्कम करण्यात झाला.

टेनिसपटू नागल, मुकुंदचा पाकिस्तानात खेळण्यास नकार

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताचे आघाडीचे टेनिसपटू सुमित नागल आणि ससीकुमार मुकुंद यांनी पुढील वर्षी फेब्रुवारीत होणाऱ्या डेव्हिस चषक लढतीसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला आहे.

नागल आणि मुकुंदच्या निर्णयामुळे भारतासमोर संघ निवडीची समस्या निर्माण झाली आहे. खेळाडूंच्या या भूमिकेबाबत भारतीय टेनिस संघटनेने नाराजी व्यक्त केली आहे.

रोहन बोपण्णाच्या डेव्हिस चषक निवृत्तीनंतर भारतीय संघ या स्पर्धेत प्रथमच एखादी लढत खेळणार आहे. ही जागतिक गट-१ मधील लढत आहे. त्यामुळे या लढतीला फार महत्त्व आहे. नागल हा पुरुष एकेरीतील भारताचा सध्याचा सर्वोत्तम टेनिसपटू असून तो एटीपी क्रमवारीत १४१व्या स्थानी आहे. मुकुंद हा ४७७व्या स्थानावर असून तो क्रमवारीनुसार एकेरीतील भारताचा दुसरा सर्वोत्तम टेनिसपटू आहे.

नागल आणि मुकुंद या दोघांनीही या लढतीसाठी आपली अनुपलब्धता 'एआयटीए' ला कळवली आहे. त्यांनी या निर्णयामागील कारण स्पष्ट केलेले नाही; परंतु सूत्रांच्या माहितीनुसार, त्यांनी या लढतीत न खेळण्यामागे पाकिस्तानात जावे लागणे हा मुद्दाच नसल्याचे समजते. ''पाकिस्तानने ही लढत हिरवळीवर खेळविण्याचा निर्णय घेतला, त्या वेळीच आपण या लढतीत खेळण्यास उत्सुक नसल्याचे सुमितने संघ व्यवस्थापनाला कळवले होते. तर मुकुंदने वैयक्तिक कारणाने ही लढत खेळण्यास नकार दिला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)